रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
वर्ष १७ • अंक १४२
www.ramprahar.com
रविवार, ८ डिसेंबर २०२४ • पाने ८ • किंमत ₹२

## माणगावमधील कुंडलिका नदीत चार जण बुडाले



**माणगाव :** आजीच्या गावी माणगाव तालुक्यातील साजे येथे एका आलेल्या कुटुंबातील चार जण कुंडलिका नदीत बुडाल्याची घटना शनिवारी (दि. ७) घडली. नवी मुंबईतील एकाच कुटुंबामधील १० ते १२ जण साजे येथे आले होते. त्यातील काही कपडे धुण्यासाठी नदीवर गेले असता एक सदस्य पाण्यात पडला. त्याला वाचविण्यासाठी गेलेले अन्य तीन सदस्यसुद्धा पाण्यात वाहून गेले. यामध्ये सिद्धेश सोनार (वय २१), काजल सोनार (वय २६), सिद्धी पेडेकर (वय १६), सोनी सोनार (वय २७) यांचा समावेश असून शोधकार्यामध्ये सिद्धेश आणि सिद्धी यांचे मृतदेह सापडले. उर्वरित दोन तरुणी काजल आणि सोनी बेपत्ता आहेत. घटनास्थळी पोलिसांसह स्थानिक लोक उपस्थित होते. पोलीस हे रेस्क्यू टीम व ग्रामस्थांच्या सहाकाऱ्याने उर्वरित दोघींचा शोध घेत आहेत.

### अंतरंग

गोमांस वाहतूक करणारी चौकडी ताब्यात/३
'रविप्रहर'मध्ये वाचा विविध विषयांवरील लेख/४
ॲडलेड कसोटीत भारतीय संघ बॅकफूटवर/८


# नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी

## विधीमंडळाच्या विशेष अधिवेशनास प्रारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

विधीमंडळाच्या विशेष अधिवेशनास शनिवारी (दि. ७) मुंबईत प्रारंभ झाला. विधानसभेत वंदे मातरम् व जय जय महाराष्ट्र माझा या राज्यगीताने कामकाजास सुरुवात झाली. यानंतर प्रामुख्याने सत्ताधारी पक्षाच्या व इतर काही आमदारांनी शपथ घेतली. दरम्यान, विरोधी पक्षातील आमदारांनी ईव्हीएमचा मुद्दा उपस्थित करीत आज आमदारकीची शपथ न घेण्याचा निर्णय घेतला. यावर सत्ताधाऱ्यांनी टीका केली आहे.

आझाद मैदानात नुकत्याच झालेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या शपथविधीनंतर विधीमंडळ सभागृहात विधानसभेच्या नवनिर्वाचित आमदारांच्या शपथविधीला शनिवारी सुरुवात झाली. या वेळी सभागृहात विधानसभेचे हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह विधानसभेचे सदस्य उपस्थित होते.



सत्ताधारी पक्षातील आमदार विविध रंगांच्या फेट्यांमध्ये विधीमंडळ परिसरात आल्याचे पहायला मिळाले. या वेळी भाजप आणि शिवसेनेचे आमदार भगव्या रंगाचे फेटे घालून आले होते, तर राष्ट्रवादीचे आमदार गुलाबी रंगाच्या फेट्यांमध्ये दिसले. पहिल्या दिवशी एकूण २८८पैकी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी या महायुतीमधील पक्षांसह समाजवादी पार्टी, एमआयएम मिळून १७३ सदस्यांनी आमदारकीची शपथ घेतली. उर्वरित आमदारांचा शपथविधी रविवारी होईल.

### आमदार प्रशांत ठाकूर यांनी संस्कृतमधून घेतली शपथ

पनवेल विधानसभा मतदारसंघातून सलग चौथ्यांदा विजयी झालेले आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधीमंडळाच्या विशेष अधिवेशनात जगातील सर्वात प्राचीन, समृद्ध, अभिजात आणि शास्त्रीय भाषा असलेल्या संस्कृतमधून विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. भाजपच्या इतरही काही आमदारांनी संस्कृतमधून शपथ घेतली, तर काहींनी जय श्रीरामचा नारा दिला.

## 'मविआ'ला आणखी एक धक्का!
# सपाने साथ सोडली

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला दारुण पराभवाचा सामना करावा लागला. अशातच विरोधकांच्या या आघाडीला आणखी एक धक्का बसला असून समाजवादी पक्षाने आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी याबाबतची घोषणा केली असून लवकरच आम्ही पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव यांच्यासोबतही चर्चा करू, असे म्हटले आहे.

सत्ताधारी महायुतीवर ईव्हीएम घोटाळ्याचा आरोप करत महाविकास आघाडीच्या आमदारांनी शनिवारी (दि. ७) विधानसभा सदस्यत्वाची शपथ न घेण्याचा निर्णय घेतला. काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या आमदारांनी शपथ घेण्याचे टाळलेले असताना महाविकास आघाडीतील समाजवादी पक्षाच्या दोन आमदारांनी मात्र शपथ घेतली. त्यानंतर आमदार अबू आझमी यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याच्या कारणाविषयी बोलताना अबू आझमी म्हणाले की, विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने पुन्हा एकदा हिंदुत्वाची भूमिका घेतली आहे. आमची सर्वधर्मसमभावाची भूमिका असल्याने आम्ही उद्धव ठाकरेंसोबतच्या आघाडीत राहू शकत नाही. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडून वारंवार बाबरी मशीद पाडल्याची आमची जखम ओली करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे आम्ही बाहेर पडण्याचा निर्णय घेत आहोत, असेही आझमी म्हणाले.

दरम्यान, समाजवादी पक्षाच्या एक्झिटमुळे आधीच संख्याबळ कमी असलेल्या महाविकास आघाडीतील आणखी दोन आमदार कमी होणार आहेत. त्यामुळे हा एक धक्का मानला जात आहे.



## शपथ न घेऊन विरोधकांनी लोकशाहीचा अपमान केला -मुख्यमंत्री

विधानसभेच्या नवनिर्वाचित आमदारांच्या शपथविधीवेळी विधानभवनात नाट्यमय घडामोडी घडल्या. महाविकास आघाडीच्या आमदारांनी विरोधकांनी विधीमंडळ अधिवेशनात उपस्थित राहूनही शपथविधीवर बहिष्कार टाकला. विरोधकांच्या या भूमिकेवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांनी लोकशाहीचा अपमान केला असल्याची टीका केली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही पलटवार करत खोचक शब्दांत विरोधकांचा समाचार घेतला आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येक पक्षाला



आणि त्यांच्या नेत्यांना त्यांनी काय वक्तव्य करायचे हा त्यांचा अधिकार आहे, पण शपथ घेण्यासाठी उद्याचा शेवटचा दिवस आहे. त्यांना उद्या संध्याकाळपर्यंत शपथ घ्यावीच लागेल, तरच परवा सभागृहामध्ये ते कामकाजात भाग घेऊ शकतात. ही प्रक्रिया सगळ्यांना माहिती आहे, परंतु पहिल्याच दिवशी आपण काहीतरी वेगळे करतोय, आम्ही जरी संख्येने कमी असलो तरी आम्ही आमचे अस्तित्व दाखवण्याचा प्रयत्न करतोय, हा त्यांचा केविलवाणा प्रकार सुरू आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री पवार यांनी महाविकास आघाडीवर निशाणा साधला.

महाविकास आघाडीकडून ईव्हीएमसंदर्भात होणाऱ्या आरोपांना उत्तर देताना उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, मीसुद्धा महाविकास आघाडीमध्ये काम केलेले आहे. या निवडणुकीत ईव्हीएमला दोष देण्यात काही अर्थ नाही. लोकसभेत ईव्हीएमने महाविकास आघाडीला ३१ जागा दिल्या. त्या वेळेस ईव्हीएम खूप चांगले होते. विधानसभा निवडणुकीत मात्र असा निकाल लागल्यावर ईव्हीएमला दोष द्यायला सुरुवात केली. त्याला काही अर्थ नाही.

भाजपचे आमदार प्रवीण दरेकर यांनी विरोधक रोज नवनव्या सुरात रडत आहेत. त्यांनी आत्मपरीक्षण करावे, असा सल्ला दिला आहे. विरोधक काही तरी नौटंकी करीत आहेत. त्यांना मतदान करून निवडून देणाऱ्या जनतेचा ते अपमान करीत आहेत, असेही दरेकर म्हणाले.

### राहुल नार्वेकर पुन्हा विधानसभा अध्यक्ष?

राज्यातील सर्व आमदारांचा शपथविधी पार पडल्यानंतर सोमवारी (दि. ९) विधानसभेच्या नव्या अध्यक्षाची निवड होणार आहे. या पदावर पुन्हा एकदा भाजपच्या राहुल नार्वेकर यांना संधी मिळण्याची शक्यता आहे. नार्वेकर यांनी गेल्या अडीच वर्षांमध्ये मोठ्या कौशल्याने विधानसभेचे कामकाज हाताळले होते. त्यामुळे आता तेच विधानसभा अध्यक्ष होतील, अशी माहिती सूत्रांनी दिली.

राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्षपदावरील निवड जवळपास निश्चित मानली जात आहे. नार्वेकर हे रविवारी दुपारी १२च्या सुमारास विधानसभा अध्यक्षपदासाठी आपला अर्ज दाखल करतील.

## निवडक

### आसामच्या हॉटेल्समध्ये बांगलादेशींना प्रवेशबंदी

**गुवाहाटी :** बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या हल्ल्यांचा भारतात अनेक ठिकाणी निषेध केला जात आहे. यातच आता बांगलादेशातील हिंदू आणि इतर अल्पसंख्यकांवर होणारे हल्ले जोवर बंद होत नाहीत, तोवर कुण्याही बांगलादेशी नागरिकाला आपण आपल्या सेवा देणार नाही, अशी घोषणा आसाममधील बराक खोऱ्यातील हॉटेल्सनी घेतली आहे. कछार, श्रीभूमी (पूर्वीचे करीमगंज) आणि हायलाकांडी या तीन जिल्ह्यांमध्ये बांगलादेशींना प्रवेशबंदी करण्यात आली आहे.

### काँग्रेसकडून केजरीवालांसह मुख्यमंत्री आतिशी लक्ष्य

**नवी दिल्ली :** आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे राजधानीतील बिघडलेल्या कायदा आणि सुव्यवस्थेवर सातत्याने प्रश्न उपस्थित करत आहेत. या मुद्द्यावरून आता दिल्ली प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष देवेंद्र यादव यांनी त्यांच्या न्याय यात्रेत केजरीवाल हे मुख्यमंत्री आतिशी यांच्या राजीनाम्याची मागणी का करत नाहीत, असा सवाल केला आहे.

# क्षयरोग दुरीकरण अभियानाचा शुभारंभ

## संधी समजून काम करूया -जिल्हाधिकारी जावळे

**रायगड : रामप्रहर वृत्त**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे २०२५पर्यंत टीबीमुक्त भारत करण्याचे स्वप्न आहे. त्यासाठी प्रयत्न करताना संधी समजून काम करूया. पनवेल हे मुंबईचे प्रवेशद्वार आहे. येथून नागरिकांची मोठ्या प्रमाणावर ये-जा होत असते. त्यामुळे येथील हॉट स्पॉट शोधून आपल्याला सातत्याने काम करावे लागणार आहे, असे प्रतिपादन रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी शनिवारी (दि. ७) केले.

केंद्रीय क्षयरोग विभागाच्या सूचनेनुसार संपूर्ण देशात आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार राज्यात पुढील १०० दिवसांच्या कालावधीत क्षयरोग दुरीकरण अभियान राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत रायगड जिल्हास्तरीय अभियानाचे उद्घाटन कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.



उद्घाटन समारंभास पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, एमजीएमचे वैद्यकीय संचालक सुधीर कदम, उपविभागीय अधिकारी पवन चांडक, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सचिन जाधव, पनवेल महापालिका उपायुक्त डॉक्टर वैभव विधाते, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. दळवी, विद्यापीठाचे शाखाप्रमुख डॉ. जी.एस. नरशेट्टी, तहसीलदार विजय तळेकर, आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे आदी उपस्थित होते.

या वेळी जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले, पनवेल महानगरपालिका ज्या पद्धतीने आरोग्य क्षेत्रात काम करते ते वाखणण्यासारखे असून अभिनंदनास पात्र आहे. आरोग्याच्या बाबतीत पनवेल स्वयंपूर्ण होण्याकरिता त्यांना संपूर्ण सहकार्य दिले जाईल. याबरोबरच या अभियानांतर्गत रायगड जिल्ह्यातील आदिवासी, कातकरी, कोळी बांधव, वीट्टभट्ट्या अशा सर्व भागांतील सर्वेक्षण केले जाईल.

पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे म्हणाले, पनवेल महापालिकेच्या वतीने नागरी क्षेत्रात आरोग्य सेवेची शंभर टक्के काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाते. यासाठी जिल्हाधिकारी जावळे यांचे व एमजीएम रुग्णालयाचे नेहमीच पालिकेला सहकार्य मिळत असते. (पान २ वर...)

### अशी होईल तपासणी आणि उपचार

या अभियानादरम्यान विभागनिहाय अतिजोखमीच्या लोकसंख्येचे आणि क्षयरुग्णांचे मॅपिंग करण्यात येणार आहे. अतिजोखमीच्या व्यक्तींची नॅट आणि एक्स रेच्या मदतीने क्षयरोगासाठी तपासणी करण्यात येईल तसेच क्षयरोग निदान झालेल्या व्यक्तींवर त्वरित व योग्य उपचार करण्यात येणार आहेत. क्षयरोग निदान झालेल्या व्यक्तींना पोषणासाठी निक्षय पोषण योजनेचा लाभ तसेच निक्षय मित्र बनवून पोषणासाठी सहाय्य देण्यात येईल, तर क्षयरोग नसलेल्या, परंतु क्षयरुग्णाच्या संपर्कात असलेल्या व्यक्तींना क्षयरोग प्रतिबंधित उपचार देण्यात येणार आहेत.



**पनवेल :** रायगड जिल्हा क्षयरोग विभागामार्फत आणि जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली टीबीमुक्त अभियान संपूर्ण जिल्हात राबविण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते या अभियानात वापरण्यात येणाऱ्या निक्षय वाहनाला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. या वेळी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सचिन जाधव, प्रांत अधिकारी पवन चांडक, डॉ. अक्षराज राठोड, माजी नगरसेवक विकास घरत यांच्यासह क्षयरोग विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# सुक्या मासळीला मोठी मागणी

**उरण : प्रतिनिधी**

ताज्या मासळीसोबतच सुकी मासळीदेखील आवडीने खाल्ली जाते. मांसाहार सेवन करायच्या वाराला घरात ताज्या मासळीचा बाजार आणला नसेल, तर घराघरात सुकी मासळीदेखील मोठ्या आवडीने खाल्ली जाते. त्यामुळे उरण परिसरातील ताज्या सुक्या मासळीला मोठी मागणी मिळत आहे.

मासळी सुकवण्याची प्रक्रिया हवामानावर अवलंबून असते. खारे वारे जोरात वाहत असतात, तेव्हा मासळी चांगल्या प्रमाणात सुकते तसेच हवामान थंडही लागते. त्यामुळे नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारीमध्ये मासळी सुकविली जाते. मासे उन्हात सुकवून त्यांच्या शरीरातून पाणी काढून टाकले जाते. मोठे मासे सुकत टाकण्यापूर्वी पोटातील आतडी काढून व स्वच्छ करून त्यानंतर मीठ लावून खारवले जाते. (पान २ वर...)





### सुक्या मासळीचे सध्याचे दर (प्रति किलो)

| | |
|---|---|
| सुकट | ४५० ते ५०० |
| आंबाडी | ४०० ते ५०० |
| मोठी वाकटी | ४०० ते ५०० |
| छोटी वाकटी | ३५० ते ४०० |
| बोंबील | ४५० ते ५०० |
| मांदेली | २०० ते २२० |
| खारी सुरमई | ८०० ते ८५० |
| बांगडा | ३५० ते ४०० |
| कोळंबी सोडे | १३०० ते १४०० |

**आम्ही आमच्याच बोटीतील ताजी मासळी सुकवून विकतो. आमच्याप्रमाणे उरण परिसरातील कित्येक मासळी विक्रेते ती सुकवतात व विक्री करतात. उरण परिसरात ताजी सुकवलेली मासळी असल्याने आमच्या मासळीला मोठी मागणी आहे.**
**-सुजाता कोळी, सुकी मासळी विक्रेत्या**

## येळकोट येळकोट...



**अलिबाग :** चंपाषष्ठीनिमित्त वरसोली येथील खंडोबा मंदिरात दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. (छाया : जितू शिगवण)

# पनवेलमध्ये पशुगणनेस प्रारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात २१व्या पशुगणनेचे उद्घाटन शनिवारी (दि.७) आयुक्त मंगेश चितळे यांच्या 'स्वराज' बंगल्यापासून त्यांच्या श्वानाची संपूर्ण माहिती ॲपमध्ये भरून करण्यात आली. या वेळी आयुक्तांच्या सुविद्य पत्नी रुपाली चितळे व चिरंजीव पार्थ चितळे उपस्थित होते.



या वेळी उपायुक्त डॉ. वैभव विधाते, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्य आयुक्त स्मिता काळे, पशुवैद्यहकिय अधिकारी डॉ. बी.एन गीते, डॉ. मधुलिका लाड, वैद्यकिय अधिकारी डॉ. मनिषा चांडक, डॉ. उषा राठोड, डॉ.माया काळे, डॉ. सुरेश पंडित, डॉ. भक्तराज भोईटे, चितळे कुटूंबिय, प्रगणक दत्ता मासाळ, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

ही पशुगणना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत मोबाईल ॲपच्या माध्यमातून केली जात असून यामध्ये पशूपालक, त्यांचा पत्ता, पशूची प्रजाती, पशूंची संख्या, नागरी व ग्रामीण क्षेत्रातील कुटुंब, कौटुंबिक उपक्रम, बिगर कोटुंबिक उपक्रम, गोशाळा आणि संस्था यांच्याकडे असलेल्या पशुधनाचे सर्वेक्षण केले जाणार आहे. या पशुगणनेमध्ये पनवेल क्षेत्रात आढळणाऱ्या पशुधनाच्या १६ प्रजातीची जातिनिहाय वयोगट तसेच लिंगनिहाय व उपयोगानुसार आकडेवारी गोळा केली जाणार आहे. या पशुगणनेमध्ये गाय-म्हैस, शेळी-मेंढी, घोडे, श्वान इत्यादी व कुक्कुट पक्षी जसे की कोंबडया, बदक इत्यादीचा समावेश असणार आहे.

या पशुगणनेकरिता पनवेल महापालिका क्षेत्रामध्ये सुमारे ४० प्रगणकांची निवड करण्यात आली असून पाच पर्यवेक्षकांची निवड करण्यात आली आहे. या पशुगणनेसाठी संनियत्रण अधिकारी म्हणून मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी काम पहाणार आहेत. तसेच प्रभारी अधिकारी म्हणून पशुवैद्यकिय अधिकारी डॉ. मधूलिका लाड तसेव मार्गदर्शक म्हणून पशुवैद्यकिय अधिकारी डॉ. बी.एन गीते काम पहाणार आहेत.

या पशुगणनेमुळे विविध फायदे होणार असून त्यानुसार शासनास धोरण तयार करता येणार आहे. या पशुगणनेमुळे दुध, अंडी, मांस व लोकर इ. पशुजन्य उत्पादनाचा अंदाज करता येणार असून याचबरोबर त्यांच्या लसीकरणचा कार्यक्रम राबविता येणार आहे. पशुगणनेनूसार पशुवैद्यकीय दवाखान्यांची संख्या ठरविणे विविध योजना राबविणे शक्य होणार आहे. या पशुगणनेमुळे पशुधन क्षेत्रातील उद्योन्मुख कल आणि भविष्यातील व्यवसाय संधी याविषयी विश्लेषण करता येणार आहे. या पशुगणनेमुळे विविध प्रदेश आणि समुदायांना त्यांच्या पशुधन संख्येवर व गरजांवर आधारित निधी, पायाभूत सेवा-सुविधा यासारख्या संसाधनांचे वाटप करण्यात मदत होणार आहे.

**ही २१वी पशुगणना २५ नोव्हेंबर २०२४ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत पूर्ण होणार आहे. प्रगणकांना पशुगणनेची अचूक व संपूर्ण माहिती देऊन सहकार्य करावे.**

**-मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल मनपा**

# मुलीला न्याय मिळवून देण्यासाठी उपोषण

## अत्याचार करणाऱ्याच्या अटकेची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एका अनुसुचीत जातीच्या मुलीला लग्नाचे अमीश दाखवून तिच्यावर अत्याचार करणाऱ्या आरोपींविरोधात ॲट्रॉसीटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाल असूनही त्यांना अद्याप अटक झाली नाही आहे. त्यामुळे आरोपींना अटक करण्याची मागणी करत रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाचे रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांच्या उपस्थितीत आणि पनवेल महानगर जिल्हा क्षेत्राचे अध्यक्ष प्रभाकर कांबळे यांच्या नेतृत्वाखाली आमरण उपोषण सुरू आहे.



आरोपी शुभम पवार याने अनुसूचित जातीच्या मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिचा वारंवार गैरफायदा घेत युवतीची फसवणूक केली होती. यासाठी त्याला वडील कृष्णा पवार आणि आई अर्चना पवार यांनी मदत केली. या प्रकरणी या तीनही आरोपींविरुद्ध खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तरीदेखील या आरोपींना अटक करण्यात आली नाही आहे. याच्या निषेधार्त तसेच तरुणीला न्याय मिळवून देत आरोपींना लवकरात लवकर अटक करावी या संदर्भात प्रभाकर कांबळे यांच्या नेतृत्वाखाली पनवेल तालुका पोलीस ठाण्यासमोर आमरण उपोषण सुरू आहे.

या उपोषणात सुरेंद्र मधुकर सोरटे, दिनेश शांताराम जाधव तसेच आरपीआयचे पनवेल महानगरप्रमुख सरचिटणीस मिलिंद कांबळे यांच्यासह पदाधिकारी सहभागी झाले आहेत.



**चौक :** ग्रामपंचायत कार्यालय बीड खुर्द येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. या वेळी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करण्यात आला. सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# दोन दिवस पाणीपुरवठा बंद

**पनवेल :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पनवेल शहराला होणारा पाणीपुरवठा सोमवारी २४ तासासाठी बंद राहणार असल्याने नागरिकांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन पनवेल मनपातर्फे करण्यात आले आहे.

सोमवार ९ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते मंगळवार १० डिसेंबर सकाळी ९पर्यंत बंद राहणार आहे. यादरम्यान सोमवारी हरिओम नगर, ठाणानाका, एचओसी, मार्केट यार्ड येथील जलकुंभातून होणारा पाणीपुरवठा सुरू राहणार आहे. तर इतर ठिकाणी बंद राहणार आहे. तसेच मंगळवारी गंगाराम सिनेमा, भाजी मार्केट, सर्व्हिस हौद, पटेल मोहल्ला येथील जलकुंभातून होणारा पाणीपुरवठा सुरु राहणार आहे. इतर ठिकाणी बंद राहणार आहे. नागरिकांनी महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन पनवेल महापालिकेने केले आहे.

# कारची रिक्षाला धडक

## सीबीडीत दोन महिलांसह चालक जखमी

**नवी मुंबई : बातमीदार**

भरधाव कारने रिक्षाला धडक दिल्याची घटना सीबीडी येथे गुरुवारी रात्री घडली आहे. या अपघातात कारचालक नशेत असल्याचे आढळून आले असून, रिक्षाचालकासह दोन प्रवासी जखमी झाले आहेत.

सीबीडी सेक्टर १५ येथे गुरुवारी रात्री ११ च्या सुमारास हा अपघात घडला. रिक्षा चालक इम्रान खान हे प्रवासी भाडे घेऊन मुंबईकडे चालले होते. त्याचवेळी पाठीमागून आलेल्या भरधाव कारने त्यांना धडक दिली. यामध्ये रिक्षाचे नुकसान झाले असून दोन प्रवासी देखील जखमी झाले आहेत. अपघातानंतर कार चालकाला नागरिकांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले असता तो नशेत कार चालवत असल्याचे उघडकीस आले. त्यानुसार चालक व्यंकटेश भोसेकर याच्यावर सीबीडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# वाहनाला अपघात; १७ जण जखमी

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

चालकाला डुलकी लागल्याने पर्यटकांना घेऊन जाणारी टेम्पो ट्रॅव्हल्स नियंत्रण सुटून रस्त्याच्या बाजूला असलेल्या झाडावर जाऊन आदळली. या अपघातात चालकासह १७ जण जखमी झाले आहेत. कल्याण-डोंबिवलीतून गुहागरला जाणाऱ्या टेम्पोला घोणसरे सुतारवाडी येथे हा अपघात झाला.

पोंक्षे परिवारातील १७ जण पर्यटनासाठी डोंबिवलीतून निघाले होते. त्यांनी १७ आसनी प्रवासी टेम्पो ट्रॅव्हल्स भाड्याने घेतली. गुहागरला व्याडेश्वर दर्शन, समुद्राचा आनंद लुटून ही मंडळी संगमेश्वर तालुक्यातील पोंक्षे आंबव येथे जाणार होती. सायंकाळी ही गाडी पूल ओलांडून घोणसरे सुतारवाडी बसथांब्यापर्यंत आली असता चालकाला डुलकी लागली आणि त्याचा गाडीवरील ताबा सुटला. ही गाडी रस्त्याच्या डाव्या बाजूला खाली उतरली आणि एका झाडावर जाऊन आदळली. ग्रामस्थांनी प्रवाशांना बाहेर काढून सर्वांना चिपळूण येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. यापैकी एक दोघांची प्रकृती गंभीर आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचे स्वागत करण्याची उमा मुंढेंना संधी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महायुतीचे नवीन सरकार स्थापन करण्यासाठी शपथविधी समारंभ आझाद मैदान मुंबई येथे गुरुवारी झाला. या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी मुंबईत विमानतळावर येताच राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला रायगड जिल्हा अध्यक्ष उमा संदीप मुंढे यांनी पंतप्रधान मोदींची स्वागतपर भेट घेतली.



पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अनमोल वेळेतील ३० सेकंदाचा संवाद त्यांनी उमा मुंढे यांच्याशी केला. या वेळी उमाताईंना पुढील राजकीय प्रवासास पंतप्रधान मोदी यांनी शुभेच्छा, आशीर्वाद दिले. भावी राजकीय कारकिर्दीत अधिक पुढे जात राहण्याचे आशीर्वाद दिले. याबद्दल उमाताईंवर रायगड जिल्हातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# भरधाव ट्रेलर हॉटेलला धडकला

## एका कामगाराचा मृत्यू

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर भरधाव वेगात जाणारा ट्रेलरने फूड कोर्ट या हॉटेलला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला असून या ट्रेलर खाली दबून एका कामगाराचा मृत्यू झाला तर ट्रेलरने तीन कारला जोरदार धडक दिली.



मुंबई पुणे एक्सप्रेसवेवरून ट्रेलर पुण्याहून मुंबई कडे जातं असताना तो बोरघाटात असताना तो एक्सप्रेसवेवरील फूड कोर्ट हॉटेलजवळ आला असता चालकाचे ट्रेलरवरील नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील फूड कोर्ट हॉटेलला जोरदार धडक दिली. यासोबतच त्याने हॉटेल समोरील तीन कारला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात हॉटेलमधील काम करणारा कामगार इंद्रदेव पासवान (रा.बिहार) याचा ट्रेलर खाली दबल्याने मृत्यू झाला आहे, तर तीन कार कारचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, मात्र सुदैवाने हॉटेलमधील अन्य प्रवाशी आणि कामगारांना कोणतीही इजा झाली नसल्याने मोठी दुर्घटना टळली आहे.

या अपघाताची माहिती मिळताच आयआरबी पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणा, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल, लोकमान्य हॉस्पिटलची टीम, बोरघाट पोलीस, अपघातग्रस्त टीमचे सदस्य तात्काळ घटनास्थळी दाखल ट्रेलरमध्ये अडकेल्या आणि त्याखाली बदलेल्या व्यक्तींना बाहेर काढून मदत केली तर अपघातग्रस्त ट्रेलर बाजूला काढून एक्सप्रेस वे वाहतुकीसाठी चालू करण्यात आला.

# माणगावात दोन कारमध्ये अपघात

## आठ प्रवासी जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव बाजारपेठेलगत एकता पेट्रोल पंपाच्या अलीकडे व मोतीराम प्लाझाच्या समोरील वळणावर शुक्रवारी रात्री दोन कारचा अपघात झाला. यामध्ये आठ जण जखमी झाले आहेत.

हा अपघात एक्स एल सिक्स कार व वॅगनर कार यांच्यामध्ये घडला आहे. गुहागर वरून मुंबईकडे जाणारी वॅगनर व मुंबई बाजूकडून खेड कडे जाणारी मारूती नेक्सा गाडी या गाड्यांमध्ये हा अपघात घडला. दोन्ही गाड्यांमध्ये चालकासहित ४-४ असे एकूण आठ प्रवासी प्रवास करत होते. यामध्ये मुंबईकडून खेडकडे जाणाऱ्या एक्स एल सिक्स कारमध्ये चालक निलेश जोगळे, प्रवासी महिला अनिता गिल्डा, स्मिता बुटाला, वर्षा चिंडक सर्व रा खेड जि रत्नागिरी तर गुहागर कडून मुंबई कडे जाणारी वॅगनर कारमधील कुटुंब चालक विकास भागवत, ज्योती भागवत, ऋग्वेद भागवत, चारवी भागवत (सर्व रा. गुहागर व सध्या रा.मुंबई) अश्या आठ जणांचा समावेश आहे.

या अपघातात आठ जण जखमी झाले असून त्यांना प्राथमिक उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे दाखल करण्यात आले. वॅगनर कारमधील दोन जणांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी मुंबई येथे हलविण्यात आले.

# खारघरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महापरिनिर्वाण दिन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

राहुल शिक्षण प्रसारक मंडळ, नवी मुंबईच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने सिद्धार्थ मल्टीपर्पज रेसिडेन्शल हायस्कूल, अंजिठा इंटरनॅशनल हायस्कूल, डॉ. जी.के. डोंगरगावकर इंटरनॅशनल हायस्कूल, डॉ. नेल्सन मंडेला आश्रम शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थ्यांच्या वतीने डॉ. बाबासाहब आंबेडकराना अभिवादन सुपारक भवन,प्लॉट न.५२ से.१९ खारघर नवी मुंबई येथे करण्यात आले.



प्रारंभी संस्थचे संचालक डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या प्रतिमेला दिप प्रज्वलन व पुष्प अर्पण करून अभिवादन केले. शाळेतील मुख्यधापक एम. एल. सुर्यवंशी, नेहा कपोते, सुजाता भोसळे, प्रमिला सनस, अंकुश कांबळे, आशा शिंदे, नवनाथ डोंगरगावकर यांनी अभिवादनपर डॉ. बाबासाहेबांच्या जीवन आणि कार्याला उजाळा दिला.

पान १ वरुन

## क्षयरोग दुरीकरण अभियानाचा शुभारंभ

याचबरोबर येत्या काळात महापालिकेचे ४५० खाटांचे माताबाल संगोपन रुग्णालय तयार होणार यासाठीदेखील सीएसआर फंडातून विविध कंपन्याचे सहकार्य आम्हाला मिळेल याची शाश्वती आहे.

या वेळी जिल्हाधिकारी तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते टीबी रुग्णांना सकस आणि पोषक आहाराच्या फूड बास्केटचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे सीएसआर फंडातून मदत करणाऱ्या पिडीलाईट, महानगर गॅस, दीपक फर्टीलायझर, ओएनजीसी, हिंडाल्को, जेएनपीए अशा निक्षय मित्र यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सीएसआर फंडामधून देण्यात आलेल्या टीबी रुग्ण तपासणीसाठीच्या डिजिटल एक्सरे मोबाईल व्हॅनचेही (निक्षय वाहन) या वेळी उद्घाटन करण्यात आले तसेच टीबीमुक्त जिल्हा करण्यासाठी शपथ घेण्यात आली.

जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सचिन जाधव यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविकात मोहिमेची सविस्तर माहिती दिली तसेच उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत केले. डॉ.पोतदार यांनी आभार व्यक्त केले.

## सुक्या मासळीला मोठी मागणी

ताज्या मासळीप्रमाणेच सुक्या मासळीतदेखील विविधता पहायला मिळते. यामध्ये वाकट्या, सुके बोंबील, कोळंबीचे सोडे, छोटी जवळा सुकट, करंदी सुकवून बनवली जाणारी आंबाडी सुकट, बारीक मासे सुकवून बनवली जाणारी टेंडली सुकट, मांदेली, ढोमी, शिंगाळा, खारे बांगडे, सुरमई, घोळीचा काटा, सुकी माकुल असे प्रकार पहायला मिळतात.

पाऊस संपताच व उन्ह पडू लागल्यावर मासळी विक्रेते मोठ्या प्रमाणावर मासळी खारवून सुकवतात. उरण तालुक्यात कोळी बांधव करंजा, मोरा या बंदरांतून करंदी, जवळा, ओल्या वाकट्या, बोंबील अशी विविध प्रकारची मासळी रस्त्याच्या कडेला उन्हात सुकवून तिचे सुक्या मासाळीत रूपांतर करतात. उन्हाळा असो हिवाळा असो किंवा पावसाळा उरण परिसरातील या सुक्या मासळीला अधिक मागणी असल्याने चांगले आर्थिक उत्पन्नही मिळते. या सुक्या मासळी विक्रीतून कित्येक कुटुंबांना आधार मिळत आहे.

# विद्युत कर्मचारी संघटनेतर्फे महामानवास अभिवादन

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी ६ डिसेंबर रोजी देश-विदेशातून लाखो अनुयायी दरवर्षी चैत्यभूमी, मुंबई येथे बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी येत असतात.


यावर्षीहि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन, बॅकवार्ड क्लासेस सिनियर इंजिनीअर्स ऍंड ऑफिसर्स असोसियेशन व स्वतंत्र मजदुर युनियन तर्फे अनुयायांसाठी आरोग्यदायी फेस मास्क, पिण्याचे पाणी बॉटल्स, बिस्कीट व अल्पोपहार यांचे मोफत वितरण दादर येथील शिवाजी पार्क मैदान येथे स्टॉल उभारून करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक मंगेश शिंदे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, महाव्यवस्थापक राजू गायकवाड, जनसंपर्क अधिकारी मिलिंद अवताडे यांच्या हस्ते वितरणास सुरुवात झाली.

या वेळी महापारेषणचे संचालक सुगत गमरे, अविनाश निंबाळकर, मुख्य अभियंता महेंद्र वाळके, भूषण बल्लाळ तसेच कर्मचारी संघटनेचे कार्याध्यक्ष संजय मोरे, कोषाध्यक्ष जीवन गायकवाड, उपसरचिटणीस अश्र्वजित गायकवाड, उपाध्यक्ष शैलेश आडे आदी पदाधिकारी यांनी विशेष सहभाग नोंदविला.



# विद्यार्थ्यांना शेअर मार्केटिंगचे मार्गदर्शन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.७) वाणिज्य विभागातर्फे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी सेक्युरिटी एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडियावर सत्र झाले.

या सत्रासाठी प्रमुख वक्त्या म्हणून नेहा गोयानी यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना सेक्युरिटी एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया व शेअर मार्केटिंग विषयी मोलाचे मार्गदर्शन केले. भारतीय भांडवल बाजाराचे नियंत्रण व विकास घडवून आणण्यासाठी एक स्वतंत्र संस्था असावी अशी गरज भासत होती त्यासाठी सेबीची स्थापना करण्यात आली त्यांनी त्यांच्या व्याख्यानात नमूद केले.

महाविद्यालयातील सुमारे १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन शंका उपस्थित केल्या प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या शैक्षणिक उपक्रमाबद्दल आयोजकांचे कौतुक केले.

सत्राचे आयोजन प्रा. विशाल देशमुख वाणिज्य विभाग प्रमुख यांनी केले तसेच प्रा. राहुल कांबळे प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. प्रमोद वाघे, प्रा. मनोज यादव, प्रा. तनुजा सुमन व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## निवडक

### मसाजच्या नावाखाली वेश्या व्यवसाय

**पनवेल :** मसाज सेंटरमध्ये मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलेविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, गुन्हे शाखा नवी मुंबई यांना हॉट स्टोन वेलनेस स्पा पहिला मजला, गुडविल गार्डन, सेक्टर ८, खारघर येथे मसाज स्पाच्या नावाने महिलांकडून जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करून घेत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्या ठिकाणी बनावट ग्राहक पाठवण्यात आला. या वेळी त्या बनावट ग्राहकाकडून वेश्या व्यवसायासाठी पाच हजार रुपये स्वीकारले. या वेळी त्या ठिकाणी तीन पिडीत महिलांकडून बॉडी मसाज करण्याच्या नावाने वेश्याव्यवसाय करून घेतला जात होता. या प्रकरणी जानवी उर्फ संध्या दिनेश चव्हाण (सेक्टर १६, खारघर) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### पनवेलमध्ये आज शौर्य संचलन

**पनवेल :** विश्व हिंदू परिषद बजरंग दल कोकण प्रांत, रायगड विभागातर्फे गीता जयंतीनिमित्त शौर्य संचलनचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल शहरातील मिडल क्लास सोसायटीच्या मैदानात रविवारी (दि.८) सायंकाळी ४ वाजता पथ संचलन व त्यांनतर विश्व हिंदू परिषदेचे प्रमुख वक्ते यांची मार्गदर्शनपार सभा होणार आहे. त्याचप्रमाणे यावेळी नागरिकांना संताचे आशीर्वचनदेखील ऐकायला मिळणार आहे. या कार्यक्रमातच्या अधिक माहितीसाठी ८२८६८५७८७९ या क्रमांकावर संपर्क साधावा तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### करंजाडे ते पनवेल कॅण्डल मार्च

**पनवेल :** महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यासाठी प्रबुद्ध सामाजिक संस्था, करंजाडे, माता रमाई आंबेडकर नगर-वडघरच्या वतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक सेक्टर ३ करंजाडे ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक पनवेल येथे कॅण्डल मार्च काढून अभिवादन करण्यात आले. या वेळी प्रबुद्ध सामाजिक संस्था, करंजाडे व माता रमाई आंबेडकर नगर, वडघर, धम्मबांधव धम्मभगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# गोमांस वाहतूक करणारी चौकडी ताब्यात

## पळस्पे फाटा येथे पनवेल पोलिसांची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

महाड येथून गोवांशाची कत्तल करून गोवंशवर्गिय जनावरांचे मांस विक्रीच्या उद्देषाने मुंबई येथे घेऊन जाणाऱ्या दोन गाड्यास पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने पळस्पे फाटा येथे जागरूक नागरिकांच्या मदतीने अडवले असून या वेळी चार जणांना पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले असून इतर तीन जण पसार झाले आहे.

महाड येथून दोन वाहनांमध्ये अवैधरित्या गौमांसची वाहतूक करणार असल्याची माहिती एका जागरूक नागरिकाला मिळाली. त्याने तात्काळ याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या अंतर्गत असलेल्या पळस्पे चौकी येथे असलेले पोलीस कर्मचारी पो.ना. जगताप व पो.शि मोकल यांना सदर घटना सांगितली. तात्काळ पोलिसंनी पळस्पे पोलीस बिट चौकीसमोरील ब्रिजखाली येथे सापळा रचून संशयित वाहने पनवेलच्या दिशेने येताना दिसताच त्यांना थांबवले.

या वेळी वाहनांमध्ये असलेले सात जण पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना त्यापैकी सलमान शेख (वय ३०, रा.कुर्ला), फैजल दसुलकर (वय २९, कुर्ला), अमीर खान (वय ४२, घाटकोपर), काषीद खान (वय २२, विक्रोळी) या चौघांना पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने ताब्यात घेतले तर इतर तिघे जण पळून गेले. या वेळी पोलिसांनी वाहनांची तपासणी केली असता गाडीत लाल रंगाचे मोठ्या जनावरांचे गोवंषवर्गिय काळ्या ताडपत्रीत झाकलेले अंदाजे ५०० ते ६०० किलो मास व मास कापण्याचे हत्यार आढळून आले.

याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ कलम ३(५), ३२५ आणि महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, १९७६ कलम ५बी, ५सी अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# पाईपलाईनचे काम बंद करण्यासाठी खारघरमध्ये भाजपचे आंदोलन





**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघरमधील भाजपच्या नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या पाईपलाईन टाकण्याचे काम बंद करण्यासाठी शनिवारी (दि.७) आंदोलन केले.

खारघरमध्ये नवी मुंबई महापालिकेच्या मोरबे धरणापासून नवी मुंबईपर्यंत नवीन पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे, मात्र या कामामुळे खारघर शहरात प्रवेश करताना नाल्याच्या प्रवाहात टाकल्यामुळे त्या परिसराचा विकास करता येत नसून नागरिकांना वाहतुक कोंडीचा सामना करावा लागत आहे.

गेल्या १० वर्षांपासून सिडको, सात वर्षांपासून पनवेल महापालिका तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सततच्या पाठपुराव्यानंतरही नवी मुंबई महापालिकेने काम करण्यास असमर्थता दर्शवली आहे. त्यामुळे खारघर नागरिकांना वाहतुक कोंडीचा सामना करावा लागत आहे. यामुळे जोपर्यंत सिडको, पनवेल महापालिका तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांना नवी मुंबई महापालिकेकडून लेखी आश्वासन आणि कालमर्यादा मिळत नाही, तोपर्यंत कामाला तीव्र विरोध राहील, असा इशारा या आंदोलनावेळी देण्यात आला. तसेच नवी मुंबई महापालिकेला मोरबे धरणातून अतिरिक्त पाणी उपसण्याची परवानगी मिळाली आहे. नवीन पाईपलाईनच्या कामामध्ये जुन्या पाईपलाईनप्रमाणे खारघर शहरासाठी १५ एमएलडी पाणी राखीव ठेवण्याची लेखी हमी मिळावी.

पनवेल महापालिका त्याचे बाजार मूल्य भरण्यास तयार आहे. त्यामुळे खारघर शहरातून जाणाऱ्या पाईपलाईनमधून खारघर नागरिकांना पाण्याचा लाभ मिळावा ही मागणी या आंदोलनातून करण्यात आली. या आंदोलनात भाजपचे रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, सचिव किर्ती नवघरे, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, नरेश ठाकूर, निलेश बाविस्कर, प्रभाग अध्यक्ष वासुदेव पाटील, युवा नेते अमर उपाध्याय, समीर कदम, ज्येष्ठ नेते किरण पाटील, सेक्टर प्रमुख केतन नवघरे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# वृद्धाला ट्रेडींगमध्ये ५८ लाखांचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात राहणार्या एका ६० वर्षीय वृद्ध इसमाला ऑनलाईन ट्रेडींगचा मोह आवरता आला नाही व ५८ लाखांचा गंडा बसला असल्याची घटना घडली असून याबाबत सायबर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

सदर ६० वर्षीय इसमाला गेल्या काही महिन्यापासून व्हॉटसअपवर शेअर मार्केटबाबत मेसेज आला. मेसेजला प्रतिसाद दिल्यानंतर त्यांना एका ग्रुपमध्ये घेण्यात आले होते. तेथे शेअर मार्केटच्या माध्यमातून होणाऱ्या नफ्याची माहिती त्यांना दिली होती. त्यामध्ये दिसणाऱ्या नफ्याला भुलून त्यांनी गुंतवणुकीसाठी सकारात्मकता दाखविली. त्यानुसार संबंधितांच्या सांगण्याप्रमाणे त्यांनी टप्प्याटप्प्याने ५८ लाख रुपये त्यांच्या खात्यावर पाठविले.

यानुसार त्यांना साडेपाच कोटी रुपयाचा नफा झाल्याचेही भासविले, मात्र नफ्याची रक्कम तसेच मुळ रक्कम काढण्यासाठी त्यांच्याकडे कर स्वरुपात अधिक रक्कमेची मागणी सातत्याने मेसेज आणि फोनद्वारे येवून लागल्याने त्यांना संशय आला व आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यानुसार त्यांनी सायबर पोलिसांकडे याबाबतची तक्रार केली असून पोलिसांनी पाच अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.



**पनवेल : सिद्धांत सामाजिक शैक्षणिक कला क्रीडा व सांस्कृतिक संस्थेच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त रक्तदान, आरोग्य, नेत्र व दातांची तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे झालेल्या शिबिराला माजी नगरसेविका दर्शना भोईर, संस्थेचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.**

# गव्हाण महाविद्यालयात फॅशन, डिझायनिंग कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी फॅशन व इंटेरियर डिझाईनिंग कार्यशाळा शनिवारी (दि.७) झाली.



श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनियर कॉलेज गव्हाणमध्ये पनवेल येथील एन.आय.एफ.डी.स्कूल ऑफ डिझायनिंग यांच्या संयुक्त विद्यमाने काजल मॅडम आणि आयुषी मॅडम यांनी इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांकरिता फॅशन तसेच इंटेरियर डिझाइनिंग संदर्भात मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी या अनोख्या कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद दिला.

बदलत्या काळामध्ये फॅशन आणि इंटेरियर डिझाईनिंग ही काळाची गरज बनली असून आपणास यामधील व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. त्याकरिता आपण या संधीचा फायदा घेण्यासाठी विविध कोर्सेसचे मार्गदर्शन देण्यात आले. विद्यार्थ्यांना व्यवसाय क्षेत्रामध्ये करिअर करण्यासाठीचा हा एक अतिशय चांगला असा मार्ग आहे, असेही या ठिकाणी सांगण्यात आले.

या कार्यक्रमाला ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे, घरत सर, खेडकर सर, चौधरी सर, ठाकूर मॅडम, पाटील मॅडम तसेच इयत्ता बारावीचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रम आयोजित करण्यासाठी विद्यालयाचे प्राचार्य गोडगे साहेब व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर यांचे सहकार्य लाभले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिन

**खारघर : प्रतिनिधी**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.७) स्टाफ वेल्फेअर समिती व ग्रंथालय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.



६ डिसेंबर २०२४, भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ६८ वी पुण्यतिथी आहे. समाजसुधारक, अर्थतज्ज्ञ, विचारवंत, राजकारणी आणि स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री भीमराव रामजी आंबेडकर यांनी अखेरचा श्वास घेतला आणि हा दिवस महापरिनिर्वाण दिवस म्हणून गणला जातो. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ही त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. पूजा लांजेकर व प्रा. रिजवाना मोमीन यांनी केली तसेच दोन्ही समितीतील इतर सर्व सदस्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.







**पनवेल : भाजप युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांना वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर, भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी सरचिटणीस प्रल्हाद केणी व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी नेतकर यांचे अभीष्टचिंतन केले.**

# तळोजातील उद्यानांमध्ये खेळाचे साहित्य उपलब्ध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा फेस १ मधील सेक्टर ९ आणि १४ मधील उद्यानांमध्ये पनवेल महापालिकेच्या वतीने लहान मुलांना खेळण्यासाठी विविध साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यांचे लोकार्पण भाजपचे पनवेल तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.६) झाले.

पनवेल महापालिका क्षेत्रातील तळोजा फेस १ सेक्टर ९ मधील वैंकुंठवासी हभप तुळशीराम बुवा दीक्षीत आणि सेक्टर १४ मधील वैंकुंठवासी अनंत बुवा घेसरकर या उद्यानांमध्ये लहान मुलांना खेळण्यासाठी साहीत्या उपलब करुन देण्यासाठी गौऱ्या गणपती महिला मंडळ तसेच भाजपचे तळोजा शहर अध्यक्ष निर्दोश केणी यांनी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेकडे पाठपुरावा केला होता होता. त्यानुसार महापालिकेच्या वतीने या दोन्ही उद्यानांमध्ये विविध साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या साहित्यांचा लोकर्पाण सोहळा शुक्रवारी झाला.

या वेळी भाजपचे तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, तळोजा शहर अध्यक्ष निर्दोश केणी, युवा मोर्चाचे अध्यक्ष विनोद घरत, मधुकर बुवा, सरपंच संतोष पाटील, जयराम केणी, मंगेश केणी, दिलीप केणी, चंदर केणी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरीक उपस्थित होते.



# मेकरथॉन स्पर्धेत 'सीकेटी'चे विद्यार्थी प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पिल्लई कॉलेज ऑफ इंजीनियरिंग नवीन पनवेलतर्फे मेकरथॉन २०२४ स्पर्धेचे आयोजन गुरुवारी (दि.५) करण्यात आले होते. नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता अकरावी व बारावी सायन्समधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत तीन गटात सहभाग घेतला होता.





अकरावी सायन्समधील अस्मिता बोर्डे, अनिशा चव्हाण, शालू शर्मा, कोमल वर्मा, यांच्या गटाने क्रिएटिव्हिटी स्पीक्स गटातून प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्याबद्दल त्यांचा ट्रॉफी व रोख दहा हजार रुपये पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. तसेच त्यांच्या मार्गदर्शक शिक्षिका प्रतिमा पडवळ यांनाही ट्रॉफी व तीन हजार रुपये रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

विज्ञान व तंत्रज्ञान अंतर्गत गटातील बारावी सायन्सचे सहभागी विद्यार्थी इंद्र वायगणकर, साई मोलवडे, अथर्व गावनांग, योगेश्वरी अंकम, आदित्य डोलस, चिन्मय ननावरे, आनंद पायरे, सुधाकर यादव, तसेच त्यांचे मार्गदर्शक शिक्षक जितेंद्र मिस्त्री या सर्वांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. ही स्पर्धा विद्यार्थ्यांना केवळ विज्ञान संकल्पनांचीच समज व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देत नाही तर नाविन्यपूर्ण प्रकल्पाद्वारे उत्तम टीमवर्क व सहयोगाला प्रोत्साहन देते.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस टी गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

संगीतकार राजेश रोशन ५० वर्षांचे करियर

# एक रास्ता है जिंदगी...




यश चोप्रा निर्मित व रमेश तलवार दिग्दर्शित दुसरा आदमी (१९७७) या चित्रपटातील चल कहीं दूर निकल जाए या गाण्याच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळचा किस्सा...

हे गाणे लता मंगेशकर, मोहम्मद रफी आणि किशोरकुमार यांच्या आवाजात ध्वनिमुद्रित करायचे होते. पडद्यावर हे गाणे एका हिल स्टेशनवर राखी व ऋषी कपूर यांच्यावर सुरु होते आणि मग राखीच्या फ्लॅशबॅकमध्ये शशी कपूर हे गाणे गातो. शशी कपूरला मोहम्मद रफींचा आवाज आहे. गाण्याच्या रेकॉर्डिंगच्या वेळेस मोहम्मद रफी काही कारणास्तव उपस्थित नव्हते. त्यांचा ट्रॅक दहा दिवसांनी ध्वनिमुद्रित करायचे ठरले. लता मंगेशकर व किशोरकुमार यांनी गायलेल्या भागाची ध्वनीफित मोहम्मद रफींकडे द्यावी म्हणजे त्यांना कल्पना येईल की गाणे कसे आहे, गाण्याचा मूड कसा आहे, पण मोहम्मद रफी यांनी ध्वनिफीत नाकारली. राजेश रोशनना प्रश्न पडला आता गाणे वेळेवर ध्वनिमुद्रित कसे होणार? रफीसाहेबांच्या गुणवत्तेबद्दल पूर्ण विश्वास आहे, पण तरीही या गाण्याची त्यांना कल्पना असलेली बरी. अशातच रेकॉर्डिंगला अवघा एक दिवस असतानाच मोहम्मद रफी यांनी हे गाणे समजून घेतले आणि दुसऱ्याच दिवशी रेकॉर्डिंगच्या वेळेस जरासे कुठे न थांबता, न अडखळता ते गायले. त्यामुळेच फर्स्ट टेक ओके झाला. या गोष्टीतून मोहम्मद रफी यांचे मोठेपण दिसून येते.

राकेश रोशन निर्मित व दिग्दर्शित कहो ना प्यार है (२०००)च्या निमित्ताने जुहूच्या सनी सुपर साऊंड रेकॉर्डिंग स्टुडिओत राजेश रोशनच्या मुलाखतीचा योग आला असता त्यानेच ही गोष्ट मला सांगितली.

राजेश रोशनने संगीतबद्ध केलेला पहिला चित्रपट मेहमूद दिग्दर्शित कुंवारा बाप (मुंबईत रिलीज २९ नोव्हेंबर १९७४)च्या प्रदर्शनास पन्नास वर्ष पूर्ण झाली. याचाच अर्थ त्याच्याही चौफेर कारकिर्दीला यशस्वी पन्नास वर्ष पूर्ण.

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

मेहमूदच्या काही वैशिष्ट्यांतील एक म्हणजे, त्याने दोघांना स्वतंत्रपणे संगीतकार म्हणून आपण निर्माता असलेल्या चित्रपटात संधी दिली आणि दोघेही संगीतकार पुत्र हा योगायोग. सचिन देव बर्मन यांचा मुलगा राहुल देव बर्मनला एम.एस. अकबर दिग्दर्शित छोटे नवाब (१९६१)च्या वेळेस, तर संगीतकार रोशन यांचा पुत्र राजेश रोशनला 'कुंवारा बाप'च्या वेळेस पहिली संधी दिली. दोघांनीही आपल्या गुणवत्ता, आत्मविश्वास, मेहनत व व्यावसायिकता या गुणांवर स्वतःचे स्थान व ओळख निर्माण केली.

राजेश रोशनने पहिलाच चित्रपट कुंवारा बापमध्ये प्रसंगानुरूप हिजड्यांचे गाणे दिले. मोहम्मद रफी, मेहमूद आणि कोरसने गायलेल्या सज रही गली हे गाणे शहरापासून ग्रामीण भागात लाऊडस्पीकरवर जणू धुमाकूळ घालण्यात यशस्वी ठरले. पारंपरिक चित्रपट संगीतावर प्रेम करणारे या गाण्याने दुखावले. तरी चित्रपटात ते फिट्ट बसले. कुंवारा बापमधील किशोरकुमारच्या आवाजातील मै हू घोडा यह है गाडी...देखील लोकप्रिय. विशेष म्हणजे चित्रपटाची सुरुवात आणि श्रेयनामावली या गाण्यापासून सुरू होते.

राजेश रोशनने पुढच्याच चित्रपट ज्युली मध्ये प्रीती सागरच्या आवाजात माय हार्ड इज बिटीन असे इंग्लिश गाणे दिले. पुन्हा एकदा उलटसुलट चर्चा. या चित्रपटातील दिल क्या करे कब किसीको (किशोरकुमार), भूल गया सबकुछ... (किशोरकुमार व लता मंगेशकर) देखील लोकप्रिय.

आपल्या पित्याचा अर्थात रोशन यांच्या चित्रपटांचा काळ वेगळा होता आणि आपण चित्रपटसृष्टीत आलो आहोत तो काळ पूर्णपणे वेगळा असल्याचे भान त्याने ठेवले.

अमिताभ बच्चनच्या सूडनायक (अॅन्ग्री यंग मॅन) वादळाचे ते दिवस होते. ढिश्यूम ढिश्यूमने पिक्चर व्यापला होता. युवा पिढीचा तो हीरो होता. अशातच राजेश रोशनने मिस्टर नटवरलाल चित्रपटासाठी त्याच्याकडून मेरे पास आओ मेरे दोस्तो हे बाल प्रेक्षकांसाठी गाऊन घेतलेले गाणे असे काही लोकप्रिय झाले की अमिताभ चिल्लर पार्टीत अर्थात बच्चेकंपनीतही लोकप्रिय झाला आणि त्याचा पार्श्वगायक म्हणूनही उगम झाला आणि त्याने त्यानंतर अनेक गाणी गायली.

खुद्द राजेश रोशनही गायलाय याची तुम्हाला कल्पना आहे? दो और दो पांच चित्रपटातील इन्हे अभी देखा नही हे किशोरकुमारने गायलेले गाणे चित्रपटात अमिताभ बच्चन साकार करतो. त्यानंतर तेच गाणे फनी स्वरुपात शशी कपूरवरही आहे. ते राजेश रोशन मजेत गायलाय.






यश चोप्रा दिग्दर्शित त्रिशलचे संगीत आपल्याला मिळावे अशी असलेली त्याची अपेक्षा यशजींनी नाकारून खय्याम यांना संधी दिली व काला पत्थर राजेश रोशनला दिला, पण त्याची दोन गाणी यशजींना न आवडल्याने त्यांनी त्याच्याऐवजी दुसरे कोणी संगीतकार घ्यावे असा विचार केला असता ती गोष्ट लता मंगेशकर यांना माहीत पडली आणि त्यांनी तसे होऊ दिले नाही.

राजेश रोशन चित्रपटसृष्टीत आला तेव्हा जुन्या पिढीतील सचिन देव बर्मन, मदन मोहन, नौशाद, सलिल चौधरी, जयदेव, खय्याम, सोनिक ओमी कमी अधिक प्रमाणात कार्यरत होते. लक्ष्मीकांत प्यारेलाल, कल्याणजी आनंदजी, राहुल देव बर्मन, उषा खन्ना जबरदस्त फॉर्मात होते. सपन जगमोहन, सपन चक्रवर्ती कार्यरत होते. रवींद्र जैन, भप्पी लाहिरीचे आगमन झाले होते. तात्पर्य राजेश रोशनला स्वतःला सिद्ध करण्यात आव्हान होते. अशा वेळी काही वेगळे करणे आवश्यक होते. त्याचे त्याने भान ठेवले.

राजेश रोशनची माझी अतिशय आवडती गाणी अनेक आप कहे और हम ना आये (देस परदेस), कां करू सजनी आये ना बालम (स्वामी), दिल क्या करे कब किसीसे (ज्युली) कहो ना... प्यार है हां तुमसे प्यार है (कहो ना प्यार है), ओ मुंगळा मै गुड की (इन्कार), कोई रोको ना दीवाने को (प्रियतमा), सज रही गली मै (कुंवारा बाप), तेरी जिंदगी की रागिणी पर (जाग उठा इन्सान), दुश्मन न करे दोस्त ने वो काम किया है (आखिर क्यू), थोडा है थोडे की जरुरत है (खट्टा मिठ्ठा), एक रास्ता है जिंदगी (काला पत्थर), सारा जमाना हसिनों का दीवाना (याराना), तुझ संग प्रीत (कामचोर), यह जीना है अंगूर का दाना (खट्टा मिठ्ठा), पलभर मे ये क्या हो गया (स्वामी), मै अकेला अपनी धुन मे मगन (मनपसंत), कोई मिल गया (कोई मिल गया). नजराना भेजा किसीने प्यार का (देस परदेस). लोगों का दिल अगर जितना है तो (मनपसंत), छूकर मेरे मनको तुने क्या इशारा (याराना).

राजेश रोशनची आणखी अनेक गाणी त्याच्या विविधतेचा सकारात्मक प्रत्यय देतेय. त्याच्यावरही उचलेगिरीचा (कॉपीचा) आरोप झाला. जुर्ममधील जब कोई बात बिघड जाए, क्या कहना चित्रपटातील ये दिल लाया है बहार ही गाणे एका विदेशी चित्रपटातील ट्यूनवर आधारित असल्याचे म्हटले गेले. सत्तर-ऐंशीच्या दशकात विदेशी ध्वनिफीतीवरून हिंदी चित्रपट संगीत याचे प्रमाण वाढत होतेच. त्यात राजेश रोशन अपवाद कसा ठरेल? तरीही त्या वाटेला तो जास्त गेला नाही.

आपला सहा वर्षांनी मोठा असलेला भाऊ राकेश रोशन निर्मित व दिग्दर्शित चित्रपटांना सातत्याने संगीत देण्यात त्याने विशेष रस घेतला. विशेषत: 'कहो ना प्यार है' (२०००) पासूनच्या वाटचालीत (तीदेखील पंचवीस वर्षांची होतेय) त्याने कुटुंबातील चित्रपट संगीतबद्ध करण्यावर जास्त भर दिला. उगाच चित्रपटांची संख्या वाढवणे, सतत आपल्याच चित्रपटासाठी रेकॉर्डिंग स्टुडिओचे बुकिंग कायम ठेवणे असे त्याने काहीच केले नाही (त्यापेक्षा आपले खासगी आयुष्य आणि आवडती झोप यांना प्राधान्य दिले.) आपल्या भावाशी मात्र त्याचे एकेका चालीवरून वाद घालत घालत गाणे रेकॉर्ड होत राहिले. अनेकदा त्याला आपल्या भावाचेच ऐकावे लागते. (मागील पंचवीस वर्षांत राजेश रोशनने फक्त पंधरा चित्रपटांना संगीत दिले.)



राजेश रोशनची संगीतकार म्हणून पन्नास वर्षांची यशस्वी वाटचाल अनेक सकारात्मक गोष्टींची. त्याचे कौतुक हवेच. चित्रपटांच्या संख्येच्या गर्दीत हरवून न जाता आपल्या गतीने, शैलीने राजेश रोशन येथपर्यंत आलाय, पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा! त्याची ही वाटचाल त्याच्याच एका लोकप्रिय गाण्यासारखी, मै अकेला अपनी धून मे मगन जिंदगी का मजा लिये जा रहा था...

# धर्मसुधारणावादी संस्कृत पंडित केवलानंद सरस्वती

गुरुवर्य केवलानंद सरस्वती म्हणजे पूर्वाश्रमीचे नारायण सदाशिव मराठे, यांचा जन्म ८ डिसेंबर १८७७ रोजी पूर्वीच्या कुलाबा (आताचा रायगड) जिल्ह्यातील रोहे तालुक्यातील सुडकोली या गावी झाला. वयाच्या अकराव्या वर्षी अलिबाग येथे काही काळ अध्ययन केल्यावर अठरा वर्षांच्या सुमारास त्यांनी वाई गाठली. वेद, वेदांगे, न्याय, व्याकरण, वेदांत इत्यादी शास्त्रांचे अध्ययन त्या-त्या शास्त्रातील विद्वानांकडे केल्यानंतर या मननशील मुनींनी आपले सर्व आयुष्य अध्ययन, अध्यापन, विद्याव्यासंग, ध्यानधारणा आणि ईश्वरभक्तीमध्ये व्यतीत केले.



केवलानंद सरस्वती यांचा विद्याव्यासंग पहाटेपासूनच सुरू होत असे. याचेही दोन भाग असत. एक अध्यापनाचा व दुसरा इतर विषयांच्या वाचनाचा. मराठी व संस्कृत भाषेमधील अन्य विषयांवरील बरेच ग्रंथ त्यांनी अभ्यासले होते. इंग्रजी शिकण्याची इच्छा असूनही त्यांना फुरसत मिळाली नाही, पण दृष्टी चौफेर असल्याने पाश्चात्त्यांचे जग, वेदपुराणांशी ज्याचा संबंध नाही असे आहे, परंतु त्याचे वैशिष्ट्य व महत्त्व समजून घेतले पाहिजे, असे त्यांचे मत होते. त्यामुळे पदार्थविज्ञान, जीवविज्ञान, व सामाजिक शास्त्रे यांसंबंधी मराठीत प्रसिद्ध झालेले विद्वानांचे ग्रंथ त्यांनी मन:पूर्वक वाचून काढले. हिंदुस्थानचा व जगाचा इतिहास, आधुनिक खगोल व भूगोल यांची उत्कृष्ट माहिती मिळविली. नव्या सुशिक्षिताला साजेशी बहुश्रुतता संपादन केली. त्यामुळे नव्या जमान्यातील धार्मिक, सामाजिक व राजकीय आंदोलनांचे समग्र स्वरूप त्यांच्या विचारांच्या कक्षेत सामावले गेले.

गुरुवर्यांचा दैनंदिन जीवितक्रम व्रतस्थ व तपस्वी माणसाचा असे. एकांतवास व विद्याव्यासंग यांत कधीही खंड पडला नाही. वाईत आल्यापासून त्यांचा माधुकरीवरच जीवन निर्वाह होता. त्यांनी कसलाही अर्थसंग्रह केला नाही, कारण त्यांना तशी वासनाच मुळापासून नव्हती. स्वत:ची सर्व कामे स्वत:च, अत्यंत वक्तशीरपणे करावयाची. वाणी व शरीर या दोहोंच्या बाबतीत टापटीप व स्वच्छता यांवर त्यांचा फार कटाक्ष होता. कितीही राग आला तरी त्यांच्या तोंडून कधीही अपशब्द आला नाही. स्वभाव प्रेमळ होता, पण त्यांच्या अत्यंत शुचिर्भूत वागणुकीचा एक प्रकारचा दरारा विद्यार्थ्यांवर असे. केवलानंद सरस्वती यांनी लोकांशीही सलोख्याचे संबंध ठेवले. अजातशत्रू या पदवीला ते खऱ्या अर्थाने प्राप्त झाले.

अध्ययन, अध्यापन यांतच आयुष्य वेचावयाचे हे नारायण मराठ्यांनी वयाच्या २३व्या वर्षीच निश्चित केले होते. त्यांनी प्रत्यक्ष विधिवत संन्यास वयाच्या ५३व्या वर्षी घेतला. जुन्या शिक्षण पद्धतीतील तीन गुण त्यांनी आग्रहाने प्रतिपादन केले. अधिक तयारीच्या विद्यार्थ्यास ते ग्रंथातील ठराविक भाग इतरांस सांगावयास लावत. इतर हेच पाठ अनेक विद्यार्थ्यांना शिकवत. यास ते 'चिन्तनिका' असे म्हणत. काही वेळेला गुरुजनांच्या अध्यक्षतेत स्वत:च्या विषयाचा काही भाग सांगण्यासाठी ते विद्यार्थ्यांच्या सभा घेत. त्यावर काही वेळेला वादविवाद होत. यामुळे विषय स्पष्टपणे समजत असे. प्रतिपादनाची सवय व उपस्थिती हे गुण वाढीस लागत. त्यामुळे उत्तम अध्यापक तयार होत.

आचार्यांनी प्राचीन प्रणालीला धरून शिक्षणपद्धती आखली, पण त्यातील वैगुण्ये व दोषस्थळे लक्षात घेऊन त्यात आवश्यक ते बदलही केले. पाठांतराचे फाजील महत्त्व कमी केले. संपूर्ण अमरकोश पाठ न करता तो कसा पाहावा हे शिकविले. पढीकपणा व कर्मठता यांपेक्षा सार व विचार यांचे ग्रहण करणारा सनातनी, पण व्यवहारज्ञ शास्त्री निर्माण करणे हे ध्येय ठरविले. 'प्राज्ञमठ' हे नाव त्यांचे गुरू प्रज्ञानंद सरस्वतींच्या स्मरणार्थ दिले गेले.

विद्वत्ता, बुद्धिमत्ता, दूरदर्शीपणा आणि परिस्थितीचे आकलन या अधिष्ठानांवर शोभणारे दोन गुण म्हणजे त्याग व नि:स्पृहता. या ऋषित्वाची छाप श्रीसोमनाथ प्रतिष्ठेच्या वेळी कन्हैयालाल मुन्शी, डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्यावरही पडली. त्यामुळे स्वतंत्र भारताचे गुरू किंवा सामाजिक क्रांतीचे अध्वर्यू अशी त्यांची सार्थ कीर्ती पसरली. स्व-धर्म व स्व-संस्कृतीच्या ज्ञानासाठी त्यांनी जशी प्राज्ञपाठशालेची स्थापना केली, तशीच संशोधनाची परंपराही स्थिर व अखंडित टिकण्याची व्यवस्था केली. पूर्वमीमांसा व वेदान्त यांवर परिश्रमपूर्वक कोश तयार केले. पूर्वमीमांसापाठाची संशोधित आवृत्ती प्रसिद्ध केली. १९२४ साली त्यांनी सोनगीर येथे प्रथम 'वेद हे अपौरुषेय नाहीत' असा पक्ष मांडून जुन्या विचारसरणीला फारच मोठा धक्का दिला. १९२७ साली अकोला येथे 'हिंदू धर्मातील सर्व जाती धार्मिक व सामाजिकदृष्ट्या समान आहेत', अशी घोषणा केली. अशासारख्या अनेक घोषणा ठराव रूपाने मंजूर झाल्या. 'धर्मनिर्णय मंडळाची भूमिका कधीही हटवादी किंवा उच्छृंखलही नाही. ती इतिहास व प्रत्यक्ष अनुमान यांवरच आधारित आहे,' असेच केवलानंद सरस्वती म्हणत. अशा या महात्म्याचे १ मार्च १९५५ रोजी देहावसान झाले.

**-हेमा डोळे**

# बाळाजी बाजीराव तथा नानासाहेब पेशवा

बाळाजी बाजीराव (१२ डिसेंबर १७२१-२३ जून १७६१) हे भट घराण्यातील तिसरा पेशवा (कार. १७४०-६१). नानासाहेब व बाळाजी बाजीराव या दोन्ही नावांनी ते प्रसिद्ध आहेत. पहिला बाजीराव व काशीबाई यांचा ज्येष्ठ मुलगा. त्यांचा जन्म मौजे साते (नाणे मावळ, जि. पुणे) येथे झाला. बाळाजीने चिमाजी आप्पा आणि अंबाजी पुरंदरे यांच्या हाताखाली लहानपणी साताऱ्यात सर्व प्रकारचे शिक्षण घेतले. शाहू महाराजांसोबत तो मिरजेत स्वारीत १७३९मध्ये होता. पहिल्या बाजीरावाच्या मृत्यूनंतर छत्रपती शाहूंनी त्यास २५ जून १७४० रोजी पेशवाईची वस्त्रे दिली. मराठी राज्याचा कारभार पहावयाचा व राज्याबाहेरील हिंदूस्थानभर मराठी सत्तेचे वर्चस्व प्रस्थापित करावयाचे हे पेशव्याचे उद्दिष्ट होते.

या सुमारास मोगल सत्ता अगदी खिळखिळी झाली होती. वायव्य सरहद्दीकडून अफगाण सेनानी अहमदशाह अब्दाली याने हिंदुस्थानवर १७४८पासून स्वाऱ्या सुरू केल्या होत्या. त्याचा बंदोबस्त करणे आवश्यक होते. इंग्रज, फ्रेंच यांचे किनाऱ्यावर आगमन होऊन शंभरावर वर्षे झाली असून या पाश्चात्य व्यापाऱ्यांनी आपल्या वखारींचे किल्ले बनवून आधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज अशी छोटी-मोठी सैन्ये उभारली होती. या सर्वांचा बंदोबस्त करावयाचा म्हणजे एका जबरदस्त केंद्रीय सत्तेची आवश्यकता होती. नवे युद्धतंत्र आत्मसात केलेल्या व आधुनिक शस्त्रास्त्रांनी सुसज्ज अशा चार-पाच फौजांची जरूरी होती. बलाढ्य सत्तेला इतका बंदोबस्त करणे शक्य होते. छत्रपतींच्या धोरणाने शिवकालीन केंद्रीय सत्ता जाऊन तिच्या ऐवजी अनेक घटकांचे संयुक्त राज्य बनत चालले होते. या घटक राज्याने एकीने काम करावे,या प्रेरणेच्या अभावी मराठी राजकारणाला पक्के स्थैर्य आले नाही. सतत मोहिमा चालवूनसुद्धा मराठ्यांना निर्णयात्मक विजय प्राप्त झाले, पण त्याचा फायदा त्यांना घेता आला नाही.

बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीचे दोन भाग पडतात : (१) जून १७४०-डिसेंबर १७४९ व (२) १७५०-१७६१. सुरुवातीच्या काळात शाहू छत्रपतींच्या अखेरीपर्यंत पेशव्याने जातीने उत्तर हिंदुस्थानात मराठी सत्तेचा विस्तार करण्याकडे लक्ष पुरविले. खान्देश, माळवा आणि त्यापलीकडील सुभे पेशव्यांच्या ताब्यात येत गेले. १७४१च्या सप्टेंबरात माळव्याचा कारभार पाहण्याच्या नायब सुभेदारीच्या सनदा सवाई जयसिंगामार्फत पेशव्याने मिळविल्या. अशा रीतीने उत्तर हिंदुस्थानात मराठी सत्तेचा पाया दृढ झाला. या एका प्रांताच्या सुभेदारीने पेशव्याचे समाधान होण्यासारखे नव्हते. पुढील वर्षी (१७४२) बुंदेलखंडात येऊन पेशव्याने आग्रा, अलाहाबाद, पाटणा आणि बंगाल प्रांतांच्या चौथाईची मागणी दिल्ली दरबाराकडे केली.



दरबारने बंगाल प्रांताचे रक्षण प्रथम पेशव्याने करावे, रघुजी भोसल्याची फौज बंगालमध्ये घुसली होती, तिला बाहेर काढावे, म्हणजे आपण बंगालच्या चौथाईचा विचार करू, असे बोलणे लावले. पेशव्याने बंगालचा सुभेदार अलीवर्दीखान याची भेट घेऊन आपल्या फौजेच्या खर्चाकरिता २२ लाख रुपये आणि बंगालच्या चौथाईस मान्यता मिळविली व भोसल्यांच्या फौजेस बंगाल प्रांतातून माघार घ्यावयास लावली. रघुजी भोसले याने पेशव्यांच्या दंडेलीविरुद्ध छत्रपतींकडे दाद मागितली. छत्रपतींनी बंगाल प्रांत पुन्हा भोसल्यांकडे सुपूर्त केला.

मोगल दरबारात दोन पक्ष होते एक, परकीय उमरावांचा तुराणी आणि दुसरा, हिंदू राजेरजवाडे व हिंदी मुसलमान नबाब यांचा इराणी. आसफजाह निजाम-उल्-मुल्क मे १७४८मध्ये मृत्यू पावला. निजामाने मराठ्यांच्या दक्षिणेतील विस्ताराला पायबंद घातला होता. १७५० ते १७६१ दरम्यानच्या काळात निजामुल्मुल्कच्या मुलांत आणि नातवांत वारसाहक्कांबाबत जो कलह निर्माण झाला त्याचा फायदा बाळाजी बाजीरावाने घेण्याचा प्रयत्न केला. पारनेर. भालकी, सावनूर, श्रीरंगपट्टण, सिंदखेड, उदगीर येथे सतत दहा वर्षे मोहिमा चालवून पेशव्याने निजामाकडील वऱ्हाड, खान्देश, बागलाण प्रांत, नासिक, त्रिंबकेश्वर, कर्नाला, शिवनेरी, अहमदनगर, दौलताबाद, बऱ्हाणपूर आणि विजापूर ही प्रसिद्ध ठाणी आणि त्याखालील प्रदेश म्हणजे निजामाच्या राज्याचा अर्ध्याहून अधिक भाग जिंकून घेतला. कर्नाटकात श्रीरंगपट्टणपर्यंत मराठी फौजांनी मजल मारली आणि खंडणी बसविली.

शाहू महाराज १७४९मध्ये मृत्यू पावले. तत्पूर्वी बाळाजी बाजीरावचा कोल्हापूर व सातारा या दोन छत्रपतींच्या गाद्या एक करण्याचा प्रयत्न फसला. शाहूंना मुलगा नव्हता. कोल्हापूरच्या संभाजीस साताऱ्याच्या गादीवर बसविण्यास त्यांचा विरोध होता. तेव्हा राजारामाची पत्नी ताराबाई हिने आपला नातू रामराजा यास गादीवर बसवावे असे सुचविले. रघुजी भोसले आदी मराठे सरदारांचे सहाय्य मिळवून पेशव्यास दूर करावे आणि स्वतःकडे राज्यकारभार घ्यावा ही ताराबाईंची महत्त्वाकांक्षा होती, पण मराठे सरदार बाईंच्या साहाय्यास येईनात. फक्त दमाजी गायकवाड पंधरा हजार फौजेनिशी साताऱ्यास येऊन दाखल झाला. त्याचा साताऱ्याजवळ वेण्या नदीच्या लढाईत पेशव्याने पाडाव केला (१७५१). अर्धा गुजरात सुभा पेशव्यास देऊ आणि १० हजार फौजेनिशी त्याच्या मोहिमेत हजर राहू, या अटीवर वर्षभराने पेशव्याने दमाजीची सुटका केली.

रामराजाने सांगोल्याच्या कराराने (१७५०) पेशव्याकडे सर्वाधिकार सुपूर्त केले. दामाजी गायकवाडबरोबर मराठा मंडळाचा विरोध नष्ट झाला होता. फक्त नाविक दलाचे प्रमुख सरखेल तुळाजी आंग्रे पेशव्यास जुमानीत नव्हते. इंग्रजांच्या मदतीने बाजीरावाने आंग्र्यांचे आरमार नष्ट केले आणि तुळाजीस कैद करून त्याची रवानगी दुर्गम किल्ल्यावर केली. साहजिकच राज्याचा कारभार पुण्याहून होऊ लागला व छत्रपती नामधारी बनले.

१७५७मध्ये अब्दालीने दिल्लीपर्यंत धडक देऊन राजधानी लुटून साफ केली. त्यानंतर कित्येक महिन्यांनी मदतीसाठी रघुनाथरावाची स्वारी दिल्लीस पोहचली. पठाणांच्या उठावास नजीबखान रोहिला कारणीभूत होता. तो मराठ्यांच्या हातात सापडला. मोठी लाच देऊन नजीबखानाने आपली सुटका करून घेतली. राघोबाने पठाण फौजांचा पाठलाग सुरू केला. सरहिंद-लाहोर ही ठाणी सर करण्यात येऊन काही मराठी फौजेच्या तुकड्या अटक पार गेल्या.

पुढे अब्दाली दुआबात उतरला, त्या वेळी नजीबखानच्या मदतीने सर्व मुसलमान नबाब अबदालीच्या झेंड्याखाली एकत्र आले. कवायती फौजेच्या आठ पलटणी आणि इतर हुजरात फौज घेऊन सदाशिवरावभाऊ दिल्लीवर चालून गेला (१७६०). बागपतजवळ अबदाली यमुना उतरून त्याने मराठ्यांची दक्षिणेतून येणारी रसद तोडली. दोन महिने मदतीची वाट पाहून निराश झालेल्या मराठे सेनेने पानिपतच्या वेढ्यातून बाहेर पडून दिल्ली गाठण्याचा प्रयत्न केला. पानिपतच्या (१४ जानेवारी १७६१) लढाईत मराठ्यांचा दारुण पराभव झाला आणि अतोनात नुकसान झाले. पानिपतच्या पराभवाची वार्ता बाळाजीस उत्तरेस जात असताना समजली व तो पुण्यास परतला. अधिक क्षीण होत चाललेली त्याची प्रकृती पानिपतच्या विशेषतः भाऊसाहेब व विश्वासराव यांच्या मृत्यूमुळे खचून गेली. तो पर्वतीवर (पुणे) शोक करीत अकाली मरण पावला.

बाळाजी बाजीरावने अंतर्गत कारभारात अनेक सुधारणा केल्या. जमिनीचा दर्जा पाहून जमीन महसूलाचे दर आखण्यात आले वाहतुकीचे मार्ग सुधारले आणि महाराष्ट्राचा व्यापार वाढविला, शेती सुधारली. परक्यांचे आक्रमण थांबल्यामुळे आणि बाहेरून खंडणीच्या रूपाने येणाऱ्या द्रव्याने महाराष्ट्र समृद्ध झाला, मात्र मराठ्यांच्या स्वाऱ्या, अब्दालीचे आक्रमण, इंग्रज-फ्रेंचांची युद्धे यांमुळे अराजक माजले.

बाळाजी बाजीराव यास दोन बायका होत्या पहिली गोपिकाबाई व दुसरी राधाबाई. त्याने राधाबाईंशी उत्तरेस जात असता १७६०मध्ये लग्न केले. तिला संतती नव्हती. गोपिकाबाईंस चार मुलगे झाले. त्यांपैकी विश्वासराव पानिपतच्या युद्धात मारला गेला व पहिला माधवराव व नारायणराव हे पुढे पेशव्यांच्या गादीवर आले यशवंतराव लहानपणी वारला.

**-वि.गो. दिघे**

# कोटब्याचीवाडीचा मार्ग होणार सुकर

## स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच डांबरी रस्ता; कामाला सुरुवात

**पाली : प्रतिनिधी**

सुधागडच्या ताडगाव ते कोटब्याचीवाडी रस्त्याचे २५० मीटर लांब रस्त्याच्या डांबरीकरणास शुक्रवारपासून सुरुवात झाली आहे. यामुळे कोटब्याचीवाडी ग्रामस्थांचा मार्ग सुकर होणार आहे. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच या वाडीपर्यंत डांबरी रस्ता जाणार आहे.



कोटब्याचीवाडी ही आदिवासीवाडी असून ही वाडी ग्रामपंचायत ताडगाव हद्दीमध्ये येते. या वाडीत जाण्यासाठी फक्त पायवाट आहे. आदिवासी बांधवांना आजारी पडल्यावर, गरोदर महिला व शाळेतील मुले व ग्रामस्थांना दळणासाठी जवळपास एक किलोमीटरच्या अंतर डोंगरामधील दगड रस्त्यातून चालत जावे लागत होते. आमदार रविशेठ पाटील व खासदार धैर्यशील पाटील तसेच जिल्हा परिषद माजी सदस्य रवींद्र देशमुख, शिवसेना युवक जिल्हा प्रमुख संजय म्हात्रे यांच्या माध्यमातून येथील अडीचशे मीटर रस्त्यासाठी दहा लाखाचा निधी उपलब्ध झालेला आहे आणि कामाची सुरुवात केली आहे. त्यामुळे कित्येक वर्षांपासून प्रलंबित असलेला कोटब्याचीवाडीच्या रस्त्याला सुरुवात झालेली आहे. त्यामुळे आदिवासी बांधवांमध्ये आनंदाची भावना आहे.

डोंगरपट्टीमध्ये विकासाचा भरपूर अभाव होता, परंतु महायुतीचे सरकार आल्यापासून, आमच्या ग्रामपंचायतीचे बऱ्याच वर्षापासून जे प्रलंबित प्रश्न आहेत त्यासाठी मागणी केली असता त्वरित निधी उपलब्ध होत आहे. त्यामुळेच या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये आमच्या ग्रामपंचायतमधील बऱ्याच नागरिकांनी विकासाला मत दिले आहे. पुढील शिल्लक राहिलेला रस्ता मे महिन्याच्या आत पंतप्रधान सडक योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करू, असे सामाजिक कार्यकर्ते सचिन साठे यांनी सांगितले.

# पथविक्रेत्यांना लागले निवडणुकीचे वेध

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगर परिषद हद्दीमधील नोंदणीकृत पथ विक्रेत्यांमधून आठ जणांची नगरपथविक्रेता समितीमध्ये निवड करण्याकरिता निवडणूकीचे आरक्षण व निवडणूकीचे कार्यक्रम जाहीर झाले होते. ही निवडणूक ४ ऑक्टोबर २०२४ रोजी मुरूड जंजिरा नगर परिषद कार्यालयातील सभागृहात निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने घेतली जाणार होती.

या मध्ये सर्वसाधारण –३ सदस्य , अनुसूचित जाती १ सदस्य, अनुसूचित जमाती– १ सदस्य, इतर मागासवर्ग – १ सदस्य, अल्पसंख्याक – १ सदस्य, विकलांग/दिव्यांनी –१ सदस्य असे एकुण ८ समिती सदस्य या निवडणुकी मध्ये २५५नोंदणीकृत मतदाते मतदान करणार होते, परंतु ही निवडणूक पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पंथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत महाराष्ट्र पथविक्रेता समिती निवडणुक २०२४ कार्यक्रम हा काही अपरिहार्य प्रशासकीय कारणास्तव स्थगित करण्यात आली होती. आता विधानसभा निवडणुका संपल्या आणि सरकार ही बसल्याने आता पथविक्रेते समिती सदस्य पदाच्या निवडणूकीचे वेध लागले असुन या निवडणुका कधी जाहीर होणार असा प्रश्न पथविक्रेते यांच्या कडुन विचारला जात आहे.

या संदर्भात मुरूड जंजिरा नगर परिषद प्रशासकीय अधिकारी – नंदकुमार आबंतेकर यांना पथविक्रेते समिती सदस्य पदाच्या निवडणूका संदर्भात विचारणा केली असता ते म्हणाले की या निवडणुकी संदर्भात मुख्याधिकारी साहेबांच्या सहीने पत्रव्यवहार निवडणूक निर्णय अधिकारी यांना करण्यात आले आहे. त्यावर ते लवकरच निर्णय घेतील आणि निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर करतील, अशी माहिती मुरूड जंजिरा नगर परिषदेचे प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आबंतेकर यांनी दिली.

# कृषी विज्ञान केंद्रातर्फे मृदा दिन साजरा

**रोहे : प्रतिनिधी**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र किल्ला रोहा आणि कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सुधागड तालुक्यातील ताडगाव या आदिवासीबहुल गावात ५ डिसेंबर हा दिवस जागतिक मृदा दिन म्हणून साजरा करण्यात आला.



कृषी विज्ञान केंद्र रोहा कार्यक्रम समन्वयक डॉ. मनोज तलाठी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ जीवन आरेकर व सचिन कार्ले, पाली कृषी विभागाचे अधिकारी मारुती आढाव, अनंत निरगुडा, सरपंच करुणा साठे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

या वेळी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. मनोज तलाठी यांनी माणसाच्या प्रमुख गरजा जसे कि अन्न, वस्त्र, निवारा यांचा मुख्य स्रोत माती असल्याचे नमूद करून तिचे योग्य संवर्धन व संरक्षण करणे गरजेचे आहे. तसेच चालू वर्षाची थीम जमिनीची काळजी घेणे मापन, निरीक्षण आणि व्यवस्थापन सांगताना मातीला होऊ देऊ नका बाधित, तरच आरोग्य संपन्न भविष्य राहील अबाधित या विषयी उपस्थित शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली. तसेच प्रत्येकाने आपल्या आयुष्यात तीन माता १) जन्म देणारी माता २) भूमाता ३) गोमाता यांना विसरू नयेत या विषयी आवाहन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जीवन आरेकर यांनी प्रास्ताविकातून आजच्या दिनाचे महत्व व गरज या विषयी मनोगत व्यक्त केले. सचिन कार्ले यांनी आजचा दिवस साजरा करण्यामागचे महत्त्व त्यामागचा इतिहास माती नमुना घेण्याची पध्दत त्याचप्रमाणे मृदा आरोग्य पत्रिकेची गरज या विषयी सखोल मार्गदर्शन केले. करूणा साठे यांनी कार्यक्रमानिमित्त उपस्थित शेतकरी बंधू भगिनींना शुभेच्छा दिल्या.

दुपारच्या सत्रात सचिन कार्ले यांनी प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन करून मातीचा नमुना घेण्याची पध्दत समाजवून सांगितली. त्यानंतर मनोज तलाठी यांनी माननीय कुलगुरू डॉ. संजयजी भावे यांच्या सूचनेनुसार विद्यापीठाने विकसित केलेल्या विविध अ‍ॅन्ड्रॉइड अ‍ॅप तसेच यु ट्यूब चॅनल याबाबत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी अ‍ॅप डाऊनलोड करण्याबाबत आवाहन केले. त्यानंतर शास्त्रज्ञांनी उपस्थित शेतकऱ्यांच्या शंकाचे निरसन करून भविष्यात या केंद्राशी संपर्क करून आपल्या अडचणींवर मात करून जास्तीत जास्त उत्पादन घेण्याबाबत सांगितले. त्यानंतर कृषी विभागाचे अधिकारी अनंत निरगुडा यांनी शासनाच्या विविध योजनांविषयी उपस्थित शेतकऱ्यांना माहिती दिली. त्यानंतर डॉ. तलाठी, श्रीमती साठे यांच्या हस्ते लाभार्थी शेतकऱ्यांना मृदा आरोग्य पत्रिकेचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला एकूण ४९ शेतकरी, महिला उपस्थित होत्या. कृषी विभागाचे अधिकारी मारुती आढाव यांनी आभार मानले.

# मिनी ऊर्जा मेळाव्यात गौळवाडी विद्यालय सरस

**कर्जत : प्रतिनिधी**

टाटा पॉवर भिवपूरी व टाटा पॉवर खोपोली सायमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने मिनी उर्जा मेळावा २०२४ आयोजित विज्ञान प्रकल्पाचे आयोजन केले होते. यामध्ये कर्जत तालुक्यातील गौळवाडी माध्यमिक विद्यालयाने प्रथम क्रमांक मिळविला असून ते दिल्ली येथे १७ डिसेंबर रोजी होणाऱ्या स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.



खोपोली सायमाळ येथे टाटा पॉवर कंपनी मार्फत आयोजित ऊर्जा मेळावा २०२४ अंतर्गत राष्ट्रीय पातळवरील विज्ञान प्रकल्पाचे आयोजन करण्यात आले होते. परिसरातील एकूण १४ शाळांनी प्रवेश नोंदवला आणि २८ विज्ञान प्रतिकृतीचे सादरीकरण करण्यात आले होते. तसेच प्रश्नमंजूषा, पोस्टर मेकिंग पुरक उपकृम घेण्यात आले स्पर्धेकरिता सहावी, ते नववी वर्गातील विद्यार्थ्यास प्रवेश देण्यात आले होते .

अभिनव ज्ञान मंदिर संस्थेच्या गौळवाडी माध्यमिक विद्यालयाला घवघवीत यश मिळाले. विज्ञान पोस्टर मेकींग स्पर्धेत आठवीतील विद्यार्थीनी नियती अनंता काजारी हिने तृतीय कृंमाक पटकावला तसेच विज्ञानातील प्रतिकृती स्पर्धेत दिव्या तुकाराम तरे व श्रेया जयवंत बार्शी नववीत शिकणाऱ्या विद्यार्थीनीं 'पर्यावरणस्नेही ऊर्जा स्त्रोत प्रकल्प' सादर केला. हा प्रकल्प स्पर्धचे लक्ष वेधून घेणारा ठरला. त्यामुळे या प्रकल्पाला प्रथम क्रमांक मिळाला. गौळवाडी माध्यमीक विद्यालयाने पटकावला व या प्रकाल्याची निवड १७ डिसेंबर रोजी दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय पातळवरीवल विज्ञान प्रदर्शनासाठी निवड करण्यात आली.

या प्रकल्पासाठी मार्गदर्शक शिक्षक म्हाणून सायली पदरे, वसंत मोरे आणि कला शिक्षक श्री बहिरू सारुक्ते यांचे अनमोल मार्गादर्शन लाभले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक रंगराव राठोड, ज्येष्ठ शिक्षक यशवंत पाडवी तसेच शिक्षकवृंद व शिक्षेकेतर कर्मचाऱ्यांकडून कौतुक करण्यात येत आहे.

# आसरे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**चौक : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन ग्रुप ग्रामपंचायत आसरे येथे आयोजित करण्यात आला होता.



या वेळी सरपंच बळीराम जांभळे यांनी सांगितले की, शिक्षण माणसाला दिशा देते, जीवनाला आकार देते, संधी मिळालीच पाहिजे आणि शिकणे माणसाचा नैसर्गिक अधिकार आहे तो कोणालाही नाकारण्याचा अधिकार नाही, मनाची शक्ती हे एकच साधन माणसाजवळ आहे, शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा असा संदेश भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिला आहे, त्याच मुळे आज आपण जीवन जगत आहोत. ते पुढे म्हणाले न्याय मागून मिळत नाही तो संघर्ष करूनच मिळवावा लागतो, हा मुलमंत्र देखील डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दिला आहे. या वेळी ग्रामपंचायत अधिकारी गोकुळदास राठोड, उपसरपंच, सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली मिळकत माझे अशिलांने कायम खरेदीखत / करारनामा करून प्रस्ताविक मिळकतीचे मालक **बळीराम लक्ष्मण पाटील वैगेरे ९** या जमीन मालकांकडुन विकत घेण्याच्या विचारात आहेत तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे –धारणी, तालुका खालापूर, जिल्हा रायगड,**

| गावाचे नाव | गट.नं/हि.न. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार |
|---|---|---|---|
| धारणी | १/१ | ०–२१–००<br>पो.ख. ०–०७–००<br>एकूण ०–२८–०० | १.७५ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टा मध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार – मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तकारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोंकांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ०७.१२.२०२४**

**सही/–**
**अ‍ॅड. श्री. दीपक आर. शेळके**
**पत्ता डी/३/१, किनारा हौ.सोसायटी,**
**बावन बंगलो पनवेल ता. पनवेल जि. रायगड**
**४१०२०६. मो.९८२०७९५६०५**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस हया जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते आहे की, आमचे अशिल माँ भवानी रिअल्टर्स तर्फे भागीदार (१) **श्री. नवनाथ पंढरीनाथ वैद**, रा. साईप्रेरणा अपार्टमेंट, रुम नं. २०२, सेक्टर नं. ५, प्लॉट नं. ३०, कामोठे, नवी मुंबई, (२) **श्री. जबरसिंग भोपसिंग राजपूत**, रा. के. एल. ६/५/३, सेक्टर नं. १ ई, हायवे दर्शन सोसा., कळंबोळी, नवी मुंबई हे सिडको लि. यांच्याकडून पुर्नवसन व पुर्नस्थापना योजने अंतर्गत लिजधारक **श्री. भाऊ धोंडू भगत, श्री. जयदास नारायण भगत** यांच्या नावे असलेला खालील वर्णनाचा भूखंड त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करुन घेण्याच्या इरादयात आहेत. सदर भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणेः–

**भूखंडाचे वर्णन**
**मौजे– पुष्पक (वडघर), ता. पनवेल, जि. रायगड**

| भूखंड नं. | सेक्टर नं. | क्षेत्र |
|---|---|---|
| १० | आर २ | ४६० चौ.मी. |

तरी सदर भूखंडावर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१४** दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह मा. व्यवस्थापक, **शहर सेवा–२, पहिला मजला, सिडको भवन, सि.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांच्याकडे अथवा खालील पत्त्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर भूखंड निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही आणि असल्यास त्या सोडून दिलेल्या आहेत असे समजण्यात येईल व सदर भूखंडाचे हस्तांतरणाचे काम पूर्ण करण्यात येईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**तारीख : ०७/१२/२०२४.**

**सही/–**
**अ‍ॅड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट,
वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ,
अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल,
ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली मिळकत माझे अशिलांने कायम खरेदीखत / करारनामा करून प्रस्ताविक मिळकतीचे मालक **दत्तू बाळू दुर्गे वैगेरे ३९** या जमीन मालकांकडुन विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे –धारणी, तालुका खालापूर, जिल्हा रायगड,**

| गावाचे नाव | गट.नं/हि.न. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार |
|---|---|---|---|
| धारणी | १४/३९ | ०–७६–९२ | ५.८७ |

**वर्णीत मिळकतीपैकी ०–४०–०० हे. आर. पॉ. क्षेत्राच्या विक्री बाबत सदर जाहीर नोटीस**

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टा मध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार – मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तकारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोंकांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ०७.१२.२०२४**

**सही/–**
**अ‍ॅड. श्री. दीपक आर. शेळके**
**पत्ता डी/३/१, किनारा हौ.सोसायटी,**
**बावन बंगलो पनवेल ता. पनवेल जि. रायगड**
**४१०२०६. मो.९८२०७९५६०५**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली मिळकत माझे अशिलांने कायम खरेदीखत / करारनामा करून प्रस्ताविक मिळकतीचे मालक **माणिक दिनानाथ पिंगळे** या जमीन मालकांकडुन विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे –धारणी, तालुका खालापूर, जिल्हा रायगड,**

| गावाचे नाव | गट.नं/हि.न. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार |
|---|---|---|---|
| धारणी | २३/० | २–३०–४० | १३.७८ |

**वर्णीत मिळकतीपैकी खाते क्र. ११ मधील माणिक दिनानाथ पिंगळे यांच्या मालकीचे ०–२०–०० हे. आर. पॉ. क्षेत्राच्या विक्री बाबत सदर जाहीर नोटीस**

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टा मध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार – मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तकारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोंकांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ०७.१२.२०२४**

**सही/–**
**अ‍ॅड. श्री. दीपक आर. शेळके**
**पत्ता डी/३/१, किनारा हौ.सोसायटी,**
**बावन बंगलो पनवेल ता. पनवेल जि. रायगड**
**४१०२०६. मो.९८२०७९५६०५**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली मिळकत माझे अशिलांने कायम खरेदीखत / करारनामा करून प्रस्ताविक मिळकतीचे मालक **तुकाराम बाबू दुर्गे** या जमीन मालकांकडुन विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे –धारणी, तालुका खालापूर, जिल्हा रायगड,**

| गावाचे नाव | गट.नं/हि.न. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार |
|---|---|---|---|
| धारणी | १४/१५ | ०–४३–०० | ५.५६ |

**वर्णीत मिळकतीपैकी खाते क्र. ४३१ मधील तुकाराम बाबू दुर्गे यांच्या मालकीचे ०–२०–०० हे. आर. पॉ. क्षेत्राच्या विक्री बाबत सदर जाहीर नोटीस**

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टा मध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार – मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तकारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोंकांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ०७.१२.२०२४**

**सही/–**
**अ‍ॅड. श्री. दीपक आर. शेळके**
**पत्ता डी/३/१, किनारा हौ.सोसायटी,**
**बावन बंगलो पनवेल ता. पनवेल जि. रायगड**
**४१०२०६. मो.९८२०७९५६०५**

## पेण नगर परिषद, पेण

**जाहीर निविदा सूचना**
**सन-२०२४-२५**

पेण नगरपरिषद, पेण जि–रायगड यांजकडून खालील कामांसाठी अनुभवी व इच्छुक व्यक्ती/संस्था/कंपनी यांचेकडून फेर निविदा / दरपत्रक मागविणेत येत आहेत.

| अ.न | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | नग (संख्या) | निविदा फॉर्म रक्कम | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | नगरपरिषद हदीतील विश्वेश्वर समशानभूमी येथे अंत्यविधी (प्रेत दहनासाठी) २ बेड खरेदी करणेबाबत. | रु.१,९०,०००/– (प्रति नग) | २ नग | रु.५००/– | रु.५०००/– |
| २. | विश्वेश्वर समशानभूमी येथील प्रेत दहनासाठी असणाऱ्या बेडवर जाळी बसविणेबाबत. | रु.१०,८५०/– | १५ नग | रु.५००/– | रु.५०००/– |
| ३. | नगरपरिषद हदीतील आर. पी. नगर. येथिल समशानभूमी येथे प्रेत दहनासाठी बेड बसविणेबाबत. | रु.१,९०,०००/– (प्रति नग) | १ नग | रु.५००/– | रु.५०००/– |
| ४. | विश्वेश्वर समशानभूमी येथे प्रेत दहानासाठी स्टेचर खरेदी करणेबाबत | रु.१५०००/– | १ नग | रु.५०/– | रु.२००/– |
| ५. | नगरपरिषद स्मशानभूमी येथिल जुनी शवदाहिनी (भंगार) विक्री करणेबाबत | २५ (प्रति किलो) | --- | --- | --- |

**-: कामाच्या अटी व शर्ती :-**

१. निविदा विक्री कालावधी दिनांक–०९/१२/२०२४ ते दिनांक १६/१२/२०२४ रोजी सायंकाळी– ५.०० वाजेपर्यंत कार्यलयात (सुटीचे दिवस वगळता) मिळू शकतील.
२. निविदा जमा करण्याचा कालावधी दिनाक–१७/१२/२०२४ रोजी साय. ४.०० वाजेपर्यंत.
३. निविदा उघडण्याचा कालावधी दिनाक १८/१२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता अथवा प्रशासकीय सोयीनुसार.
४. या बाबतची अधिक माहिती नगरपरिषदेचे आरोग्य विभाग कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.

**जा.क्र. पेनप/का.५/आवि/२०२४/२६८०**
**पेण नगरपरिषद कार्यालय**
**दिनांक : ०६/१२/२०१२**

**सही/–**
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**पेण नगरपरिषद, पेण**

# बांगलादेशमध्ये हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराचा आज नवी मुंबईत निषेध

**नवी मुंबई : बातमीदार**

बांगलादेशमध्ये हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात नवी मुंबईतील सकल हिंदू समाजाच्या वतीने रविवारी (दि.८) नवी मुंबईत मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात विविध धार्मिक संस्था, संघटना, संत, कीर्तनकार व धर्माभिमानी हिंदू नागरिक सहभागी होणार आहेत.


(संग्रहित छायाचित्र)

बांगलादेशात अलीकडेच सत्तांतर झाले व महंमद युनूस यांच्या नेतृत्वात अराजकाचे सरकार स्थापित झाले आहे. जेव्हा पासुन हे सरकार अस्तित्वात आले तेव्हापासुन बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदू हे कट्टरपंथी मुस्लिम अराजकतावादी मुस्लिम यांच्या अत्याचाराचे बळी जात आहेत. हिंदू व इतर अल्पसंख्याक समुदायातील जनतेवर मुस्लीम कट्टरपंथीयांकडून होत असलेले हल्ले, हत्या, लूटमार, दरोडे, जाळपोळीच्या घटना, महिलांवरील अत्याचार, अल्पसंख्याक समुदायातील मुलं व महिलांवरील अमानवीय अत्याचार हा भारतातील हिंदू समुदायाला चिंता करायला लावणारा आहे. या सर्व घटनांचा निषेध व्यक्त करण्यासाठी नवी मुंबईतील सकल हिंदू समाजाच्या वतीने रविवारी, संध्या ४ वाजता गावदेवी मरीआई माता मंदिर, जुहूगाव ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, वाशी पर्यंत निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

बांगलादेशमधील हिंदूंनी त्यांच्यावरील अन्याय, अत्याचारांनंतर आवाज उठवण्याचा प्रयत्न केला, मात्र तिथल्या सरकारने त्यांचा आवाज दाबून ठेवला आहे. तिथल्या हिंदूंनी आंदोलन करण्याचा प्रयत्न केला, मात्र बांगलादेशी सरकारने हिंदूंची आंदोलने चिरडली.


इस्कॉनचे हिंदू धर्मगुरू चिन्मय दास जी यांना परवा बेकायदेशीरपणे अटक करण्यात आली. त्यांच्या वकीलांची हत्या करण्यात आली. त्यांच्या समर्थकांना भारताचा व्हिसा असतानादेखील भारतात येण्यास मनाई करण्यात आली.

# नवी मुंबईत आज पल्स पोलिओ मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात रविवार (दि.८) उपराष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. यामध्ये ० ते ५ वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओ लसीकरण करण्यात येणार असून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाने पोलिओ लसीकरणाचे सुयोग्य नियोजन केले आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ० ते ५ वर्ष वयोगटामधल्या अपेक्षित ९१२१३ बालकांच्या लसीकरणाचे लक्ष्य ठेऊन मोहीमेचे नियोजन करण्यात आले आहे. त्याकरिता २५ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या क्षेत्रात ६०९ स्थायी, ७५ ट्रांझिट व २७ फिरते मोबाईल असे एकूण ७११ बुथ कार्यरत असणार आहेत. या लसीकरण मोहिमेसाठी मॉल, रेल्वे स्टेशन, बस स्टँड अशा वर्दळीच्या ठिकाणी ट्रांझिट व फिरती मोबाईल पथके तयार करण्यात आलेली आहेत.




भारत देश पोलिओमुक्त आहे, परंतू काही देशांमध्ये अद्याप पोलिओ असल्याने तो पुन्हा परत येऊ शकतो यासाठी पल्स पोलिओ मोहीम राबविली जात आहे. त्याचप्रमाणे महापालिका वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे यांच्या अध्यक्षेतखाली सिटी टास्क फोर्स समितीची बैठक घेण्यात आली असून नियोजनाचा आढावा घेण्यात आला तसेच पल्स पोलीओ लसीकरण मोहीम यशस्वीपणे राबविण्याकरिता वैद्यकीय अधिकारी, एनएम, एलएचव्ही, एएनएम, आशा व स्वयंसेवक यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे.

या मोहीमेकरीता महापालिका कार्यक्षेत्रात जनजागृतीपर पोस्टर्स व बॅनर्स लावण्यात आले आहेत. पल्स पोलिओ लसीकरण मोहीमेच्या दिवशी बूथवरील स्वयंसेवकांनी बाळाला हाताचा स्पर्श होणार नाही याची काळजी घेणे तसेच डाव्या कंरगळीवर पेनने खूण करताना बाळाचा हात न पकडणे याबाबत प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

या पोलिओ लसीकरण मोहिमे अंतर्गत ज्या बालकांनी ८ डिसेंबर २०२४ रोजी डोस घेतला नसेल त्यांना महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने ८८९ टिमद्वारे गृहभेटीमध्ये पुढील पाच दिवस घरोघरी जाऊन डोस देण्यात येणार आहे. याकरिता प्रत्येक टिमचे कार्यक्षेत्रनिहाय सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे.

पालकांनी पोलिओवर मात करण्यासाठी देशव्यापी मोहिमेत सहभागी व्हावे आणि आपल्या ० ते ५ वर्ष वयोगटातील प्रत्येक बालकाला पल्स पोलिओ लसीकरण करुन घ्यावे, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# निवडणुकीदरम्यान जप्त रक्कम केली परत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल मतदार संघात आचारसंहिता कालावधीत भरारी पथक आणि स्थिर सर्वेक्षण पथकाने बारा ठिकाणी कारवाई करत ३७ लाख २५ हजार ५७० रुपये जप्त केले होते. यातील दहा जणांना पैसे परत करण्यात आले आहेत तर दोन जणांना पैसे परत देण्यात आलेले नाहीत.

आचारसंहिता कालावधीत भरारी पथक आणि स्थिर सर्वेक्षण पथक तैनात करण्यात आले होते. या काळात अधिकची रक्कम बाळगण्यास बंधने घालण्यात आली होती. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, आचारसंहिता पथक प्रमुख, एस एस टी पथक प्रमुख, पोलीस यांच्या उपस्थितीत शेडूंग चेक पोस्ट, पळस्पे, पळस्पे फाटा, कळंबोली चेक पोस्ट ई. ठिकाणी भरारी पथक आणि स्थिर सर्वेक्षण पथकाने बारा ठिकाणी कारवाई करत तब्बल ३७ लाख २५ हजार ५७० जप्त केले. यातील दहा जणांना २५ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर दरम्यान तीस लाख १४ हजार ७० रुपये परत करण्यात आलेले आहेत.

जप्त केलेल्या रकमेबाबत कोणतेही तक्रार दाखल नसल्यास आणि ही जप्ती उमेदवार, राजकीय पक्ष किंवा निवडणूक प्रचाराशी संबंधित नसल्यास ती रक्कम रिलीज करण्यासाठी आदेश जारी केला जातो आणि त्यानंतर ती रक्कम परत केली जाते.

# खारघर येथे आरोग्यविषयक शिबिराला प्रतिसाद

**खारघर : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊन तर्फे मनुस्मृती ज्येष्ठ नागरिक गृह, खारघर येथे मेगा मेडिकल कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते.

नवी मुंबईतील गरजू आणि वंचित नागरिकांची मोफत सेवा करण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मेगा मेडिकॅम्प साईटवर खालील स्पेशॅलिटी डॉक्टर्स उपलब्ध होते.

या शिबिरात दंतवैद्य, त्वचारोगतज्ज्ञ, ऑर्थोपेडिक सर्जन, चिकित्सक, ईएनटी, ऑन्कोलॉजिस्ट, बालरोगतज्ञ, स्त्रीरोगतज्ञ, नेत्रचिकित्सक या विशेष डॉक्टर्स सोबत मोफत रक्त तपासणी आणि हाडांच्या खनिज घनतेचे मापन या सेवादेखील नागरिकांसाठी मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या होता. यासोबतच आरसी न्यू पनवेल द्वारा संचालित रक्तपेढीच्या मदतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या मोहिमेत एकूण २६ निरोगी स्वयंसेवकांनी रक्तदान केले. या शिबिराला खारघर मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल आणि फ्लॅगशिप बायोटेक इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड यांचे सहकार्य लाभले.

मेगा मेडिकॅप शिबिरात एकूण ४० रोटेरियन्सनी सक्रिय सहभाग घेतला आहे आणि मॅजिक ऑफ रोटरी तयार करण्यासाठी त्यांची सेवा दिली आहे. रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊनने आयोजित केलेल्या मेगा वैद्यकीय शिबिराचा एकूण १५० रुग्णांनी लाभ घेतला, ज्याचे अनेक गरजू रुग्णांनी कौतुक केले, अशी माहिती पब्लिक इमेज डायरेक्टर कमलेश अगरवाल यांनी दिली.





# भीम अनुयायांना अल्पोपहार वाटप



**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी आमदार रमेश पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. तसेच चैत्यभूमी येथे येणाऱ्या बाबासाहेबांच्या सर्व अनुयायांकरिता दरवर्षीप्रमाणे पाणी व अल्पोपहार वाटप करण्यात आला.

या वेळी रबाळे पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सावंत, कोळी महासंघाचे युवा प्रदेशाध्यक्ष ॲड. चेतन पाटील, राजू वानखडे, संतोष कोटकर, निकेतन पाटील, चारुदत्त ठाणांबिर, संगम मिश्रा तसेच मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या समाज बांधवांनी बाबासाहेबांना अभिवादन केले.

माजी आमदार पाटील यांनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले आयुष्य देशातील सामाजिक विषमता, जातीय भेदभाव आणि वंचित वर्गाच्या हक्कासाठी लढण्यात घालविले असून त्यांचे जीवन सर्व भारतीयांसाठी प्रेरणास्त्रोत असल्याचे सांगितले.



**कळंबोली : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भाजप कळंबोली मंडलच्या वतीने पक्ष कार्यालयात अभिवादन करण्यात आले.**

# कळंबोली वाहतूक शाखेची पार्किंगबाबत वाहतूकदारांसोबत बैठक

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली वाहतूक शाखेच्या हद्दीत जड अवजड वाहनांचे पार्कीगंमुळे वाहतूक कोंडी होणार नाही याकरीता पोलीस निरीक्षक हरीभाऊ बानकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक साठे व पथक यांनी जड अवजड वाहतूकदार यांची कॉर्नर बैठक बिमा नाका या ठिकाणी घेतली.



कळंबोली वाहतूक शाखेच्या हद्दीत जड अवजड वाढत्या वाहनांचे संख्येमुळे पार्कीगची समस्या निर्माण होत असून सदर वाहनांचे पार्कींग करीता जागा उपलब्ध होत नाही. त्यामुळे काही वाहन चालक हे त्यांची वाहने कळंबोली लोखंड व पोलाद बाजाराचे हद्दीतील सेवा रस्त्यावर ज्या ठिकाणी जागा मिळेल त्या ठिकाणी पार्क करीत आहेत. मार्गावर सकाळ व संध्याकाळचे वेळेस इतर वाहनांचे वाहतूकीकरीता कमी लेन उपलब्ध होत असल्याने वाहतूक कोंडी होत असलेबाबत मल्टीमेडीया तसेच व्टिटरव्दारे तक्रारी या तसेच वरिष्ठ कार्यालयात प्राप्त होत आहेत. तसेच त्याबाबत वर्तमानपत्रातदेखील बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत.

या मार्गावर जे वाहनचालक दुसऱ्या व तिसऱ्या लेनमध्ये वाहने पार्क करतील त्यांचेवर मोटार वाहन कायदयान्वये कारवाई करण्यात येत आहे, परंतु वाहने पार्कंगची संख्या कमी होत नसल्याने सदर वाहनचालकांवर भारतीय न्याय संहिता कलम २८५ अन्वये कारवाई सुरू करण्यात आलेली असल्याचे समक्ष सांगितले आहे.

यापुढे लोखंड व पोलाद बाजाराचे मुख्य सेवा रस्त्यावर दोन्ही बाजुस दोन तसेच तीन लेनमध्ये वाहने पार्क करू नयेत, वाहतूक पोलिसांनी दिलेल्या सुचनांचे व नियमांचे पालन करावे याबाबत माहिती देण्यात आली अन्यथा प्रचलित कायद्यान्वये कारवाई करण्यात येईल, अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खारघर भाजपकडून अभिवादन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना भाजप खारघर मंडल व भाजप अनुसूचित जाती मोर्च्याच्या वतीने भाजप जनसंपर्क कार्यालय, सेक्टर १३ या ठिकाणी अभिवादन करण्यात आले.

भारतीय जनता पार्टी, खारघर मंडलाच्या वतीने बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून, मेणबत्त्या प्रज्वलीत करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. शिवाय बुद्ध वंदना म्हणून त्यांच्याप्रती आदर व्यक्त केला. कोकण दर्पणचे संपादक प्रो. संजय महाडिक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि त्यांची संघर्षगाथाही विस्तृतपणे सांगितली.

सरचिटणीस दीपक शिंदे, माजी नगरसेवक शत्रुघ्न काकडे, जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, भागवत गायकवाड, अमर उपाध्याय, सीमा खडसे, जगताप, संतोष शर्मा व प्रदीप शेलार यांनी महामानव बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करून आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक खारघर शहर मंडल अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष संदीप माघाडे यांनी केले तर खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील यांनी महामानव बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून कार्यक्रमाला सुरुवात केली.

या वेळी मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक शत्रुघ्न काकडे, सरचिटणीस दीपक शिंदे, उपाध्यक्ष किरण पाटील, महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष संदीप माघाडे, रजनी शर्मा, जुमा चक्रवर्ती, अश्विनी भुवड, सीमा खडसे, प्रवीण बेरा, आदित्य हाटगे, प्रकाश ओव्हाळ, तुकाराम कंटाळे, आर्यन कदम, तुकाराम साठे, शबाना कुरेशी, सबा कुरेशी, ज्योती वाव्हाळ, शुभांगी ढोले, अश्विनी मोरे, सीताराम जगताप, प्रदीप शेलार, अर्जुन वाघमारे, शहाजी सोहोनी, जयंतीभाई भगत, वाडीभाई पटेल, रमेश महेंद्रू, अजय माळी, राजेंद्र मांजरेकर यांच्यासहित तथागत महाविहार सामाजिक संस्थेचे पदाधिकारी, भाजप कार्यकर्ते, पदाधिकारी व भीम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अपघातग्रस्त चिमुकलीवर ‘अपोलो’त यशस्वी उपचार

**पनवेल : वार्ताहर**

भीषण कार अपघात ग्रस्त ५ वर्षाच्या लहानग्या मुलीचा जीव अपोलो हॉस्पिटलने वाचवला आहे. मल्टिडिसिप्लिनरी मेडिकल टीमने जीवनरक्षक देखभाल व तत्काळ उपचार करून मुलीचा जीव वाचवला.

पाच वर्षांची मुलगी आई स्नेहा हिचा वाढदिवस साजरा करून आई-वडिलांसोबत घरी परतत होती. एका एसयूव्हीने त्यांच्या कारला धडक दिली, दुर्दैवाने वडिलांचा जागीच मृत्यू झाला, लहान मुलगी आणि तिच्या आईला जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. आईची प्रकृती स्थिर होती, परंतु पाच वर्षांच्या मुलीला गंभीर दुखापत झाली होती, तिच्या नाकातून आणि तोंडातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत होता आणि तिला श्वास घेण्यास खूप त्रास होत होता.

मुलीला प्रगत गंभीर उपचारांसाठी अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईत नेण्यात आले. अपोलो हॉस्पिटल्सच्या आपत्कालीन कक्षात या मुलीला आणले तेव्हा ती बेशुद्ध आणि खूप शॉकमध्ये होती. तपासणीमध्ये आढळून आले की डोके आणि चेहऱ्याच्या हाडांचे फ्रॅक्चर तसेच हातापायांचे फ्रॅक्चर, जबडा, मनगट, कॉलरबोनचे फ्रॅक्चर आणि फुफ्फुसांना अनेक जखमा झालेल्या होत्या.

डॉ.अभिजित बागडे, क्लिनिकल लीड-पेडियाट्रिक इंटेन्सिव्ह केअर ॲण्ड जनरल पेडियाट्रिक्स, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई म्हणाले, आमच्या समोर आलेल्या सर्वात आव्हानात्मक प्रकरणांपैकी ही एक केस होती. मुलीचे वय खूपच लहान होते आणि तिला अनेक ठिकाणी फ्रॅक्चर झालेली होती, खूप जास्त रक्त वाहून गेले होते, जखमा गंभीर आणि गुंतागुंतीच्या होत्या. संपूर्ण हॉस्पिटलचे लक्ष तिच्याकडे होते, त्या सर्वांच्या शुभेच्छांसह आम्ही उपचार सुरू केले. मुलीचे वय खूपच लहान असल्यामुळे डोके, चेहरा आणि हाताच्या फ्रॅक्चरच्या दोन शस्त्रक्रिया करण्यात आल्या, ज्यामध्ये विशेष काळजी घेण्यात आली.

# महामानव डॉ. आंबेडकर यांना नवी मुंबईत अभिवादन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील सर्व राजकीय पक्ष , विविध बौद्ध धार्मिक संस्था तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुयायीच्या वतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिननिमित्त महामानवास भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.



नवी मुंबईतील रबाळे-ऐरोली परिसरात मातोश्री अनुसया सोनावणे चॅरिटेबल ट्रस्टच्या पुढाकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्व संध्येला रबाळे-ऐरोली परिसरात डॉ.आंबेडकर अनुयायीनी भव्य कॅडल मार्च काढून विनम्र अभिवादन केले. माजी महापौर सुधाकर सोनावणे, माजी नगरसेविका रंजना सोनावणे यांच्या उपस्थितीत मातोश्री अनुसया सोनावणे चॅरिटेबल ट्रस्टच्या पुढाकार कॅन्डल मार्च काढण्यात आला.

आंबेडकर नगर बुद्ध विहार, गौतम नगर येथील कलिंगा बुद्ध विहार, निब्बान टेकडी बुद्ध विहार, भीम नगर आणि क्रांती चौकातून पंचशील विहारात त्रिशरण आणि पंचशील गाथा घेऊन कॅन्डल मार्चचा समारोप करण्यात आला. मान्यवर कांशीराम हिंदी विद्यालय आणि छत्रपती शाहू महाराज विद्यालयात माजी मंत्री, आमदार गणेश नाईक, माजी खासदार संजीव नाईक यांच्या प्रमुख उपस्थितील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर ऐरोली येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन येथे महामानवास अभिवादन करण्यात आले.

या वेळी सर्वपक्षातील आंबेडकरी अनुयायी, माजी नगरसेवक, नगरसेविका, विविध धार्मिक संस्था पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते. वाशी येथे बुद्ध प्रतिष्ठान, स्वराज्य पक्ष, नवी मुंबई यांच्या वतीने नेरुळ सेक्टर ८ येथील एल मार्केटमध्ये उपाध्यक्ष स्वप्नील घोलप, उदय साळवी आणि अन्य भीमअनुयायीनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पाजली वाहून अभिवादन केले. सिबिडी आयकर कॉलनी येथील धम्मदीप सामाजिक संस्था यांच्या वतीने भव्य कॅन्डल मार्च सर्वश्री विठ्ठल गायकवाड, आत्माराम मागाडे, बी. के.पवार, भीमसेन तपासे, किरण जाधव यांच्या पुढाकाराने काढण्यात आला.

या वेळी सिबीडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संदेश रेवळे यांनीही उपस्थित राहून महामानवास अभिवादन केले. जुईनगर सेक्टर २३ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतीक भवन मधील त्रिरत्न बुद्ध विहार, मूलगंध कुटी विहार, नेरूळ येथील कपिलवास्तू बुद्ध विहार येथे महामानवास अभिवादन करण्यात आले.

# पेण पाणीपुरवठा कार्यालय धोकादायक इमारतीत

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुका उपअभियंता ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालयाची इमारत धोकादायक झाली असल्याने कर्मचाऱ्यांना जीव मुठीत घेऊन काम करावे लागत आहे, मात्र संबंधित प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष झाले आहे. दरम्यान, एखादा मोठा अपघात झाल्यास यास जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे आजही कित्येक कार्यालये भाड्याच्या इमारतीमध्ये आहेत. त्यातीलच हे ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालय आहे. या इमारतीच्या गॅलरीला पूर्णतः तडे गेले असून ती केव्हाही पडण्याची शक्यता आहे. या कार्यालयात एक उपअभियंता, दोन शाखा अभियंता, दोन कार्यालयीन कारकून, एक शिपाई असे कर्मचारी असून साईडवर काम करणारे कर्मचारीदेखील या कार्यालयात हजेरीसाठी ये-जा करत असतात. याशिवात वेगवेगळ्या साईडवर काम करणाऱ्या एजन्सीचे कर्मचारीदेखील या कार्यालयात येत असतात. त्यामुळे दुर्दैवाने काही घटना घडल्यास कर्मचारी मोठ्या संकटात येऊ शकतात.

या इमारतीला महिन्याला पंधरा ते वीस हजार रुपये भाडे शासन देत आहे, मात्र सुरक्षतेच्या दृष्टीने धोकादायक प्रथमदर्शी ही इमारत दिसत आहे. त्यामुळे कर्मचारी एक वेगळ्या दडपणाखाली काम करत असल्याचे समजले.

दरम्यान, या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले आहे की नाही याबाबत मला कल्पना नाही, परंतु इमारत मालकाला स्ट्रक्चरल ऑडिट करण्याच्या सूचना दिल्या आहेत, अशी माहिती ग्रामीण पाणीपुरवठा अभियंता आर.जे. पाचपोर यांनी दिली.





## जीवना परिसरात पाण्याचा अपव्यय; जलवाहिनीला गळती लागल्याने पाणी रस्त्यावर

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धनमधील जीवना कोळीवाडा या ठिकाणी पाणी वाया जाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे आणि या समस्येवर नगरपालिका कार्यवाही करताना दिसत नाही.

नवीन पाईपलाइनद्वारे नागरिकांना नळ कनेक्शन दिले गेले, पण त्याची योग्य देखभाल आणि निगराणी केली जात नाही. त्यामुळे दररोज हजारो लिटर पाणी रस्त्यावर वाहत आहे. पाणी हे एक महत्त्वाचे संसाधन आहे आणि त्याचा अपव्यय केल्याने पर्यावरणावर व भविष्यात नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर गंभीर परिणाम होऊ शकतो. ते पाहता नगरपालिकेने उपाययोजना करणे आवश्यक आहे.



## नागोठणे येथे नेत्रचिकित्सा शिबिरास प्रतिसाद



**नागोठणे : बातमीदार**

लायन्स क्लब नागोठणेतर्फे तसेच आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल यांच्या सहकार्याने व दानशूर व्यक्तिमत्व हभप विजय शहासने यांच्या सौजन्याने त्यांच्या मातोश्री कै. मंदाकिनी शहासने यांच्या स्मरणार्थ मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे विभागातील नेते भाईसाहेब टके यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून करण्यात आले. या शिबिरामध्ये एकूण ५८ लोकांचे चेकअप करण्यात आले. यात २६ मोतिबिंदू रुग्ण आढळले. त्या सर्वांना पनवेल येथे ऑपरेशनसाठी पाठवण्यात आले असल्याची माहिती लायन्स क्लबचे विवेक सुभेकर यांनी दिली. या वेळी नेत्रचिकित्सा शिबिराबाबत लायन्स क्लबचे सेक्रेटरी डॉ. अनिल गीते यांनी माहिती दिली.

मोफत मोतिबिंदू शिबिर लायन्स क्लब नागोठणेतर्फे दर महिन्याच्या पहिल्या बुधवारी घेण्यात येते. या शिबिराबाबत अधिक माहितीसाठी ९२७०४९९११३ या मोबाईल नंबरवर संपर्क करावा, असे आवाहन विवेक सुभेकर यांनी केले आहे.

# खोपोलीत ऊर्जा मेळा; विविध स्पर्धा



**खोपोली : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात टाटा पॉवरने महाराष्ट्र स्तरावर आयोजित केलेल्या ऊर्जा मेळ्यामध्ये १० शाळांमधील ६०पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी मिळून नाविन्यपूर्ण ॲक्टिव्हिटीजमधून ऊर्जा संवर्धनाविषयी माहिती आणि स्टिम शिक्षण मिळवले. रायगड जिल्ह्यातील खोपोली या ठिकाणी टाटा कंपनीमार्फत ऊर्जा मेळा २०२४ या महत्त्वपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमाचा उद्देश शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित शिक्षणाचे महत्त्व वाढविणे हा आहे. यामध्ये विज्ञान, चित्रकला, प्रश्न मंजुषा स्पर्धा, पोस्टर मेकिंग, विज्ञान कार्य मॉडेल अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

## चिनी मिनी बोरे खाण्यास लज्जतदार

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यातील शाळा-कॉलेज, एस.टी. बसस्थानक, किंवा दवाखान्याच्या परिसरात; त्याचप्रमाणे बाजारामध्ये चिनी मिनी बोरे काही छोटे दुकानदार तसेच हातगाडीवर विकली जात आहेत. या बोरांना चांगली मागणी आहे.

चिनी मिनी बोरे हा एक लोकप्रिय खाद्यपदार्थ असून जो महाराष्ट्रात आणि काही इतर प्रदेशांमध्ये एक खास आवडीने लोक खात असतात. ही बोरे चवदार आणि पौष्टिक असल्याने लोक ती विकत घेतात. बोरे गोड असल्याने त्यावर मसाला व मिठ लावल्यावर खाण्यास खूपच छान लागतात. ही बोरे आरोग्याच्या दृष्टीनेसुद्धा लाभधारक आहेत.



यामध्ये गोड आणि तिखट चव असते. काही वेळा तिखटपणासाठी मिरची आणि इतर मसाले टाकले जातात. त्यामुळे त्यांचा मिश्रित स्वाद लोकांना आकर्षित करतो. ही बोरे आरोग्याला अनेक फायदे देऊन जातात. पचन सुधारण्यासही मदत होत असते, कारण त्यात तिखटपणा, गोडवा आणि कधी कधी खारट, तुरटपणा यांचा उत्तम समतोल असतो. ही बोरे श्रीवर्धन मार्केटमध्ये विकण्यासाठी आल्याने लोक ती आवडीने खरेदी करून त्याचा मनमुराद आनंद घेताना दिसत आहेत.

## कर्जत येथे वाहनाने घेतला पेट

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत चारफाटा येथे रात्रीच्या सुमारास मोठी दुर्घटना होता होता वाचली. टाटा कंपनीचा हायवा डम्पर कर्जत दिशेने जात असताना रेल्वेला सप्लाय करणाऱ्या लाईनला ट्रकने धडक दिली आणि गाडीने अचानक पेट घेतला. घटनेदरम्यान चालकाला विजेचा धक्का बसल्याने त्याने तत्काळ गाडीतून उडी मारली. त्यामुळे त्याच्या जीवितास धोका पोहचला नाही, मात्र तो थोडा जखमी झाला आहे.

मोटरसायकलवरून प्रवास करणारे माजी नगरसेवक सोमनाथ ठोंबरे यांनी प्रसंगावधान राखून अनेक वाहनांना थांबवले. त्यामुळे मोठा अनर्थ टाळला. घटनेची माहिती ठोंबरे यांनी दिल्याने कर्जत नगरपालिकेचे फायर ब्रिगेड, एमएसएसईबी, रेल्वे, पोलीस यांना परिस्थिती नियंत्रणात आणली. डम्परचालकावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# श्रीवर्धनमध्ये तुषार सिंचनाचा वापर

## ◆ शेतकरी व बागायतदारांकडून पहिली पसंती

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यातील शेतकरी व बागायतदार तुषार सिंचनाला प्राथमिक पसंती देत आहेत. मजुरीची कमतरता, पाणीपुरवठा यामुळे शेतकरी व बागायतदारांसाठी तुषार सिंचनाचा पर्याय महत्त्वाचा ठरतोय.

जलसिंचनाच्या पारंपरिक पद्धतीत बदल झाला आहे. पूर्वी शेतकरी हे विहिरीच्या माध्यमातून पाणी वापरत होते, परंतु आता तुषार सिंचनामुळे पाणी अधिक प्रभावीपणे वापरले जात आहे. तुषार सिंचनाच्या वापरामुळे पाण्याची मोठी बचत होते. त्यामुळे शेतकरी व बागायतदारांसाठी हे फायदेशीर ठरते.

श्रीवर्धन तालुक्यातील जमीन आणि हवामान नारळी पोफळीच्या झाडांसाठी पोषक असल्याने आणि तुषार सिंचनामुळे या झाडांना अधिक पाणी मिळून एका तासात अनेक वाड्यांना पाणी देता येते. पाणी वापरण्याचे प्रमाण कमी झाले आहे, ज्यामुळे पाणी साठवण आणि वापर अधिक कार्यक्षम होत असल्याचे दिसून येते. शेतकऱ्यांना तुषार सिंचनाने अधिक कार्यक्षम जलसिंचन मिळते. त्यामुळेच



त्यांच्या उत्पादनात सुधारणा होते. कमी वेळेत अधिक पाणी मिळते आणि मजुरांची कमतरता भासत नाही. यामध्ये वेळ आणि पैशाची मोठी बचत होऊ शकते.

पारंपरिक पद्धतीत शेतकऱ्यांना विहीर, मोटार आणि जलवाहिन्या इत्यादी साधनांचा वापर करून पाणी सोडायला खूप वेळ आणि पैसे खर्च करावे लागतात. याउलट तुषार सिंचन पद्धतीत एकाच वेळी एकापेक्षा जास्त वाड्यांना जलसिंचन करता येते. ज्यामुळे वेळ वाचतो आणि खर्च कमी होते. विशेष म्हणजे या पद्धतीने पाण्याचे योग्य प्रमाण वापरले जाते, ज्यामुळे पाणी फुकट जात नाही. पाणी झाडाच्या मुळांपर्यंत अधिक अचूकपणे पोहचते आणि हे साचवलेले पाणी अधिक काळ टिकते. पारंपरिक जलसिंचन पद्धतीमध्ये पाणी अनेक वेळा साचून राहते किंवा मातीला अधिक मिळून जाते, पण तुषार सिंचनामुळे हे टाळता येते. यामुळे पाण्याची बचत होते आहे आणि भविष्यात पाण्याची कमतरता भासणार नाही याची दखल बागायतदारांकडून घेतली जात असल्याचे दिसून येत आहे.

# महाबळेश्वरची रसरशीत स्ट्रॉबेरी पोलादपुरात

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर शहरातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या सर्व्हिस रोड तसेच ओव्हरब्रिजवर सध्या महाबळेश्वरची रसरशीत स्ट्रॉबेरी विकण्यासाठी दरवर्षीप्रमाणे काही शेतकरी घेऊन येऊ लागले आहेत, मात्र जमिनीखालून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग गेल्याने स्ट्रॉबेरीची विक्री जेमतेम असून लालचूटूक फळांनी ग्राहकांचे लक्ष वेधण्यास सुरुवात केली आहे.



पोलादपूर तालुक्यात पावसाळ्यामध्ये अतिवृष्टी, हिवाळ्यात कडाक्याची थंडी आणि उन्हाळ्यामध्ये प्रचंड उष्णता असे तीनही ऋतू कमालीचे तीव्र स्वरूपात अनुभवावे लागत असतात. यामुळे प्रयोगशील शेतकऱ्यांना शेंगदाणा, हळद, बटाटे, कांदे अशी अपारंपरिक पिके घेण्यास संधी मिळते, मात्र ही संधी यशस्वी करणारे शेतकरी या पिकांच्या उत्पादनामध्ये सातत्य ठेवत नसल्याचा अनुभव तालुक्यातील कृषी पर्यवेक्षकांना येत आहे. काही वर्षांपूर्वी मोरगिरी येथील एका प्रयोगशील शेतकऱ्याने दीड-दोन एकर शेतजमीनीवर स्ट्रॉबेरीची लागवड यशस्वी केली, मात्र बाजारातील मागणी आणि महाबळेश्वर-पांचगणीच्या स्ट्रॉबेरी उत्पादनाशी स्पर्धा यामुळे त्या शेतकऱ्याला स्ट्रॉबेरी लागवडीचे सातत्य टिकविता आले नाही.

पोलादपूर एसटीस बसस्थानकासमोरील ओव्हरब्रिजवरील हातगाड्या तसेच जुन्या पोलीस स्टेशनच्या इमारतीच्या परिसरातील महाबळेश्वर-वाई-सुरूर रस्त्यावर महाबळेश्वर परिसरातील स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकरी रसरशीत लालचूटूक स्ट्रॉबेरी टोपल्यांमधून विकण्यासाठी घेऊन बसतात. सध्या प्रतिकिलो १८० ते २०० रुपये दर आहे, पण स्ट्रॉबेरीचे फळ काहीसे आंबट असल्याने ग्राहकांकडून केवळ हौशीपोटी खरेदी केली जात आहे. शिमग्यापूर्वी या फळाची गोडी व आवक वाढून दरसुद्धा कमी होतात.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग पोलादपूर येथील सर्व्हिस रोडच्या जमिनीखाली तब्बल ३० ते ३५ फूट खोलवरून गेल्याने स्ट्रॉबेरीसाठी महामार्गावरील ग्राहक उपलब्ध होत नसल्याने स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकऱ्यांना सध्या केवळ बाजारपेठ व मागणी टिकवून ठेवण्यासोबत रोज उपलब्ध होणारी स्ट्रॉबेरीची फळे नासून जाण्यापूर्वी विकून प्रवासभाडे व चरितार्थ चालविण्यापुरती कमाई करण्यासाठीच धडपड करावी लागत आहे.

## माथेरानमधील पत्रकारांची आरोग्य तपासणी

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान प्रेस क्लबच्या सर्व पत्रकार बांधवांची आरोग्य तपासणी माथेरान येथील बैरामजी जिजीभाई रुग्णालयात घेण्यात आली. येथील आरोग्य अधिकारी डॉ. रूपाली मिसाळ, डॉ. रॉय सर्व परिचारिका आणि रुग्णालय कर्मचारी यांच्या उत्तम सहकार्याने हे आरोग्य तपासणी शिबिर यशस्वीरित्या पार पडले.

रायगड प्रेस क्लबचे सहसंघटक व माथेरानचे जेष्ठ पत्रकार मिलिंद कदम यांच्या पुढाकाराने माथेरान प्रेस क्लब च्या सर्व पत्रकार बांधवांची आरोग्य तपासणी बुधवारी माथेरान बी.जे. रुग्णालयात घेण्यात आली.



या वेळी माथेरान ज्येष्ठ पत्रकार मुकुंद रांजाणे, गिरीश पवार, संतोष खाडे, संजय भोसले, चंद्रकांत सुतार या पत्रकार बांधवांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तर माथेरान नगरपालिका मुख्याधिकारी तथा प्रशासक राहुल इंगळे, माथेरान नगरपालिका कार्यालय अधीक्षक सदानंद इंगळे, प्रवीण सुर्वे, ज्ञानेश्वर सदगीर, लेखापाल अंकुश इचके, स्वच्छता विभाग नरेंद्र सावंत अभियंत्या करुणा बांगर यांचेपण सहकार्य या वेळी माथेरान प्रेस क्लबच्या सर्व पत्रकार बांधवांना मिळाले.

# ॲडलेड कसोटीत भारत बॅकफूटवर

## दुसऱ्या दिवशी निम्मा संघ तंबूत; ५ विकेट गमावून १२८ धावा फलकावर

**ॲडलेड : वृत्तसंस्था**

ॲडलेड कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारताने दुसऱ्या डावात पाच विकेट गमावून १२८ धावा केल्या आहेत. त्यामुळे ऑस्ट्रेलियाकडे अद्याप २९ धावांची आघाडी आहे. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात शानदार फलंदाजी करत १५७ धावांची चांगली आघाडी मिळवली. खेळाच्या तिसऱ्या दिवशी ऋषभ पंत आणि नितीश कुमार रेड्डी टीम इंडियाचा डाव पुढे नेतील. पंत २८ धावा करून खेळत आहे, तर नितीश कुमारही १५ धावा करून नाबाद आहे.



गुलाबी चेंडू कसोटीच्या दुसऱ्या दिवशी दोन्ही संघांच्या मिळून १४ विकेट पडल्या. दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियन संघाने १ बाद ८६ धावांवरून आपला डाव पुढे नेला. टीम इंडियाच्या गोलंदाजांनी दिवसाच्या सुरुवातीला चांगली कामगिरी केली होती, पण ट्रॅव्हिस हेडने १४० धावांची खेळी करून ऑस्ट्रेलियाला मजबूत स्थितीत आणले आणि संघाने ३३७ धावांचा डोंगर उभारला.

ऑस्ट्रेलियाविरुद्ध टीम इंडियाचे फलंदाज दुसऱ्या डावातही चांगली कामगिरी करू शकली नाहीत. भारतीय संघाने निःसंशयपणे १२८ धावा केल्या आहेत, परंतु यादरम्यान त्यांनी पाच मोठ्या विकेट गमावल्या आहेत. दुसऱ्या डावात टीम इंडियाची टॉप ऑर्डकर सपशेल फेल ठरली. यशस्वी जैस्वाल, केएल राहुल, विराट कोहली आणि शुबमन गिल पुन्हा एकदा फ्लॉप ठरले, तर रोहित शर्मानेही सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करताना निराश केले. ऋषभ पंत आणि नितीश रेड्डीने पुन्हा एकदा भारताचा डाव सावरला आहे.

भारताविरुद्ध डे नाईट कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाने १५७ धावांची भक्कम आघाडी घेतली आहे. डलेड कसोटी सामन्यात टीम इंडियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघ केवळ १८० धावा करू शकला. नितीश कुमार रेड्डीशिवाय टीम इंडियाच्या पहिल्या डावात इतर कोणत्याही फलंदाजाला धावा करता आल्या नाहीत.

ऑस्ट्रेलियाची ही आघाडी भारतासाठी मोठी धोक्याची ठरू शकते, कारण या सामन्यापूर्वी खेळल्या गेलेल्या २२ दिवस-रात्र कसोटी सामन्यांमध्ये पहिल्या डावात पिछाडीवर पडून संघ जिंकण्यात यशस्वी झाल्याचे फार कमी वेळा पहायला मिळाले आहे. आतापर्यंत खेळल्या गेलेल्या २२ दिवस-रात्र कसोटी सामन्यांमध्ये असे केवळ दोनदा घडले आहे. जेव्हा पहिल्या डावात आघाडी घेतल्यानंतर संघ पराभूत झाला आहे. म्हणजेच एकूणच भारतासाठी विजय खूप कठीण दिसत आहे.

# जयपूर पिंक पँथर्स आणि यु मुंबा यांच्यात बरोबरी

**पुणे : प्रतिनिधी**

शेवटच्या क्षणापर्यंत रोमहर्षक ठरलेला जयपूर पिंक पँथर्स आणि यु मुंबा यांच्यातील प्रो कबड्डी स्पर्धेचा सामना २२-२२ असा बरोबरीत सुटला. पूर्वार्धात यु मुंबाकडे १२ विरुद्ध ८ अशी चार गुणांची आघाडी होती.



श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथील बॅडमिंटन हॉलमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत जयपूर पिंक पँथर्स व यु मुंबा यांच्यातील सामना ही अतिशय चुरशीने खेळला गेला. सांघिक कौशल्याच्या जोरावर यु मुंबा संघाने मध्यंतराला १२-८ अशी महत्त्वपूर्ण आघाडी घेतली होती, मात्र उत्तरार्धात जयपूर संघाच्या खेळाडूंनी पकडी व खोलवर चढाया असा खेळ करीत त्यांची आघाडी कमी करण्याचा प्रयत्न केला. शेवटची दहा मिनिटे बाकी असताना १५-१५ अशी बरोबरी होती. शेवटची पाच मिनिटे बाकी असताना १८-१८ अशी बरोबरी होती. चार मिनिटे बाकी असताना जयपूर संघावर लोण चढविण्याची मुंबा संघाला संधी होती, मात्र या संधीचा लाभ त्यांना घेता आला नाही.

जयपूर संघाकडून अंकुश राठी याने पकडीमधील २०० गुणांचा टप्पा ओलांडला. जयपूर संघाकडून रेझा मीर बाघेरी यांनी गुण नोंदवले रोनक सिंग व निरज नरवाल यांनीही त्याला चांगली साथ दिली. यु मुंबा संघाकडून रोहित राघव याने चार, तर सोमबीर याने सात गुण नोंदविले.

# 'आरडीसीए'च्या स्पर्धेत पनवेल संघ विजेता



**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १६ वर्षाखालील मुलांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत पनवेलच्या सागर कांबळे क्रिकेट अकॅडमी संघाने विजेतेपद पटकाविले आहे. पनवेलने अंतिम सामन्यात एसबीसी महाड संघावर आठ गडी राखून विजय मिळवत बाजी मारली.

पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर स्पर्धेचा अंतिम सामना सागर कांबळे क्रिकेट अकॅडमी पनवेल विरूद्ध एसबीसी महाड संघांमध्ये खेळला गेला. नाणेफेक जिंकून प्रथम महाडच्या संघाला फलंदाजी करण्याचे आमंत्रण पनवेल संघाने दिले. महाड संघाने ३४ षटकांमध्ये सर्व गडी गमावत ११२ धावसंख्या केल्या. मधल्या फळीत प्रथमेश मोरे ३३ व जुनेद खानने २० धावा काढल्या. पनवेल संघाकडून प्रतीक बोटे याने भेदक गोलंदाजी करीत महाडचा अर्धा संघ तंबूत धाडला. त्याने पाच गडी बाद केले, तर हिमांक धोका तीन आणि रूद्र खोपकर याने दोन विकेट घेतल्या.

यानंतर सागर कांबळे क्रिकेट अकॅडमी संघाने २४व्या षटकात दोन गडी गमावत ११२ धावांचे लक्ष्य पूर्ण केले ओम साळुंके ५१ व तेजस गिलबिले यांनी नाबाद २९ धावा काढून संघाला विजय मिळवून दिला. महाड संघाकडून आमन पठाण व वत्सल मोरे यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

संपूर्ण स्पर्धेत एकूण २८ संघांनी सहभाग घेतला होता. प्रथम साखळी व नंतर बाद फेरीनुसार रंगलेल्या स्पर्धेत ४८ एकदिवसीय सामने यशस्वीरित्या झाले.

अंतिम सामन्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, खजिनदार प्रशांत ओक, सहसचिव जयंत नाईक, सदस्य ॲड. पंकज पंडित, प्रदीप खलाटे, सामनाधिकारी सुरेश म्हात्रे, एजाज मारूफ, सागर मुळे, आदेश नाईक, विघ्नहर्ता मुंढे, शेखर भगत, पनवेल संघाचे प्रशिक्षक सागर कांबळे, विकास पवार, रोहित कार्लेकर, महाडचे प्रशिक्षक आवेश चिचकर यांच्यासह दोन्ही संघांचे खेळाडू, क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

# वाडगाव येथे कुस्ती पंच व कोच प्रशिक्षण शिबिर

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथे कुस्ती पंच व कोच प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. खासदार सुनील तटकरे जिल्हा कुस्ती प्रशिक्षण केंद्रात रविवारी (दि. ८) सकाळी १० वाजता या शिबिरास सुरुवात होईल.

रायगड जिल्ह्यातील होतकरू कुस्ती पंच व कोच यांना प्रशिक्षणासाठी हे शिबिर रायगड जिल्हा कुस्तीगीर व अलिबाग तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष जयेंद्र भगत यांच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील कुस्ती पंच व कोच यांनी या प्रशिक्षण शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन भगत यांनी केले आहे.

या शिबिरास राष्ट्रीय कुस्ती पंच व रायगड जिल्हा कुस्ती कोच संदीप वाजणे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

# जिजाई बालमंदिर व नाखवा शाळेचा क्रीडा महोत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

जिजाई बालमंदिर व मो.कृ. नाखवा हायस्कूल ठाणे शाळेतील क्रीडा महोत्सव नुकताच झाला. यामध्ये वैयक्तिक व सांघिक स्पर्धा झाल्या.

प्राथमिक विभागाच्या क्रीडा महोत्सवास शाळेचा माजी विद्यार्थी कबड्डीपटू कुमार म्हात्रे प्रमुख पाहुणा म्हणून उपस्थित होता. त्याच्या हस्ते या क्रीडा महोत्सवाचे उद्‌घाटन करण्यात आले, तर नाखवा माध्यमिक विभागाच्याही क्रीडा स्पर्धा झाल्या. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका ऋतुजा गवस यांच्या हस्ते या क्रीडा स्पर्धेचे उद्‌घाटन करण्यात आले.

खेळीमेळीच्या व उत्साही वातावरणात क्रीडा स्पर्धा झाल्या. या वेळी चमचा लिंबू, धावणे, लंगडी, कबड्डी, खो-खो, बादलीत बॉल टाकणे असे विविध खेळ घेण्यात आले. मुख्याध्यापक ऋतुजा गवस, बबन निकुंभ यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा महोत्सव यशस्वी झाला.



# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात क्रीडा स्पर्धा









**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

विद्यालयाच्या क्रीडा शिक्षिका वेदांगी म्हात्रे यांनी सांघिक खेळात खो-खो, कबड्डी क्रिकेट; तर वैयक्तिक खेळात लांब उडी, उंच उडी, गोळाफेक, थाळीफेक १०० मीटर धावणे, २०० मीटर धावणे या स्पर्धांचे नियोजन केले होते.

या स्पर्धांसाठी पंच परीक्षक म्हणून श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेज गव्हाण येथील क्रीडा शिक्षक एस. एस. पारखे व गुरुकुल प्रमुख संदीप भोईर यांना आमंत्रित करण्यात आले होते.

श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व जुनिअर कॉलेजच्या माजी मुख्याध्यापिका साधना डोईफोडे यांच्या हस्ते क्रीडा स्पर्धांचे उद्‌घाटन झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनात खेळाचे महत्त्व काय आहे हे आपल्या मार्गदर्शनातून समजावून सांगितले.

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आणि सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांनी क्रीडाज्योतीचे प्रज्वलन करुन विद्यार्थ्यांना आरोग्याच्या दृष्टीने खेळ व व्यायामाचे महत्त्व आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये विषद केले.

खो-खो, कबड्डी व क्रिकेट या सांघिक खेळामध्ये मुले आणि मुली यांनी उत्साहाने भाग घेतला. यामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आलेल्या संघांना परीक्षकांनी घोषित केले.

विद्यालयाच्या उपशिक्षिका विशाखा गावंड, पल्लवी पवार, आशा कस्पटे यांनी मैदानावरील विद्यार्थ्यांच्या शिस्तीचे आणि त्यांच्या अल्पोहाराचे नियोजन केले होते. विद्यार्थ्यांनी अतिशय शिस्तीने आपल्या खेळांचे प्रदर्शन केले आणि स्पर्धांचा आनंद लुटला.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व परीक्षक म्हणून उपस्थित राहून उत्तमरीत्या स्पर्धा घेतल्याबद्दल एस.एस. पारखे व संदीप भोईर यांचे आभार मानले.

# उरणच्या मैत्रेयला राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक

## राष्ट्रीय चॅम्पियनशिपसाठी निवड

**उरण : वार्ताहर**

जळगाव येथे झालेल्या महाराष्ट्र राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत उरण तालुक्यतील जसखार येथील मैत्रेय गणेश मोकल याने सुवर्णपदक जिंकले. त्याची १६ जानेवारी रोजी छत्तीसगडमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



जळगाव येथील राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत शंभरहून अधिक स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धेत ९३ किलो वजनी गटात मैत्रेय मोकल याने ६६० किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावले. या कामगिरीची दखल घेऊन मैत्रैयची नॅशनल चॅम्पियनशिपसाठी निवड झाली आहे. याबद्दल अनेकांनी त्याचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# राष्ट्रीय सिकई चॅम्पियनशिपसाठी रायगडातील खेळाडूंची निवड

**मुरूड : प्रतिनिधी**

पंचकुला (हरियाणा) येथे होणाऱ्या २५व्या नॅशनल सिकई चॅम्पियनशीपकरिता महाराष्ट्र संघात रायगड जिल्ह्यातील आठ खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. त्यात मुरूड तालुक्यातील पाच आणि अलिबाग तालुक्यातील तीन खेळाडूंचा समावेश आहे.



पंचकुला येथील ताऊ देवी लाल स्टेडियममध्ये ७ ते ९ डिसेंबरदरम्यान राष्ट्रीय स्तरावरील सिकई मार्शल आर्ट चॅम्पियनशीप होणार आहे. या स्पर्धेत देशभरातील राज्यपातळीवर प्रथम क्रमांक पटकावणारे उत्कृष्ट खेळाडूंची निवड केली जाते. नुकतेच वर्धा येथील राज्यस्तरीय सिकई स्पर्धेत सुवर्णपदक पटकावणाऱ्या रायगड जिल्ह्यातील आठ खेळाडूंची महाराष्ट्रातील संघात निवड झाली आहे. यात मुरूड तालुक्यातील मजगावचे ध्रुव शिल्पा कळके, काव्या केतन नाक्ती, रेश्मा मंगेश भोईर, नांदगावचे अमोघ समित दळवी, आर्यन स्वप्नील गद्रे तसेच अलिबाग तालुक्यातील ऋग्वेद विकास नाईक, देवदत्त मनीष पडवळ आणि शिव देवजी हिलम यांचा समावेश आहे.

दि. रायगड डिस्ट्रिक्ट सिकई मार्शल आर्ट असोसिएशनचे अध्यक्ष विजय चंद्रकांत तांबडकर यांच्या नेतृत्वात महिला संघ व्यवस्थापक श्रद्धा श्रीकांत गद्रे व पुरुष संघ व्यवस्थापक केतन विष्णू नाक्ती यांच्याबरोबर संघ हरियाणाकरिता रवाना झाला असून सर्व क्रीडाप्रेमींकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com